शनिवार, २५ नोव्हेंबर २०२३

⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १०७

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 25 NOV. 2023 adhunikkesari.com Adhunik Kesari ●YEAR-03 ●ISSUE-107 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05


## चित्तथरक काटेबारस



शेकडो वर्षांपासून चालत असलेल्या काटेबारस या पारंपरिक यात्रेची सांगता पुणे जिल्ह्यातील गुळुंचे गावात शुक्रवारी झाली. या प्रसंगी सुमारे दीडशेहून अधिक भविकांनी काट्याच्या ढिगाऱ्यात उड्या मारून आपले नवस पूर्ण केले. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

### महत्त्वाची बातमी

## इंडिया आघाडी अग्रेसर राहणार : आदित्य ठाकरे

आधुनिक केसरी न्यूज

**खेड :** आदित्य ठाकरे यांनी शुक्रवारी खेड येथील ग्रामस्थ आणि पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्य सरकारवरही टीका केली. खळा बैठकीला कालपासून सुरुवात केली. हा शब्द परवापासून इतका पॉप्युलर झाला की ग्रामस्थांपेक्षा माध्यमातील लोक जास्त येतील अशी भीती होती, असे आदित्य ठाकरे म्हणाले. आता गणपती, दसरा, दिवाळी सण गेले. पुढच्यावर्षी निवडणुकीचा सण येणार आहे. इथे जसे भगवे वातावरण दिसत आहे, तसे महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात भगवे वातावरण निर्माण होत चाललेले आहे. उत्तराखंड, केदारनाथ, बद्रीनाथ, छत्तीसगढ, झारखंडला जाऊन आलो. तिथे बदलाचे वारे वाहू लागले आहेत. कर्नाटकात भाजपाने सर्वकाही वापरले, पण त्यांचे ४० टक्क्यांचे भ्रष्टचार सरकार जनतेने पाडले आणि नवे सरकार बसवले. मिझोराम, तेलंगणा, राजस्थान, छत्तीसगड, मध्य प्रदेश या पाचही ठिकाणी काँग्रेस जिंकणार आणि आपली इंडिया आघाडी अग्रेसर राहणार, असा विश्वासही त्यांनी बोलून दाखवला. लोकसभा असो वा विधानसभा, निवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचाच आणि महाविकास आघाडीचाच विजय होणार आहे.
हे जर खोटे असते तर खोके सरकारने गद्दारांच्या ४० मतदारसंघामध्ये निवडणुका घेतल्या असत्या, असेही आदित्य ठाकरे म्हणाले. हे चित्र सगळीकडे आहे. लोक निवडणुकीला घाबरत आहेत. पक्षातून राजीनामा देतात, सगळेच राजीनामा देतात. तो लोकशाहीचा भाग आहे. पण ते पदाचा राजीनामा देतात, निवडणुकीला सामोरे जातात आणि जिंकतात. पण आपले खोके सरकार पळाले सुरतला. तिथून गुवाहाटी आणि मग गोव्याला आले आणि आता बिळात लपले आहे. आताही प्रत्येकवेळी दिल्लीला पळत असते, अशीही टीका त्यांनी केली.

## अभ्युदय को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालकांवर आरबीआयची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय रिझर्व्ह बँकेने अभ्युदय को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळावर कारवाई केली आहे. बँकेच्या संचालक मंडळाला 12 महिन्यांच्या कालावधीसाठी हटवण्यात आले आहेत. या सहकारी बँकेत मोठ्या प्रमाणावर निम्न-मध्यमवर्गीयांची खाती आहेत. बँकेवर कारवाई झाल्याने ग्राहकांमध्ये सध्या चिंतेचे वातावरण आहे. रिझर्व्ह बँकेकडून बँकेच्या कारभाराचे व्यवस्थापन करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाचे माजी मुख्य महाव्यवस्थापक सत्य प्रकाश पाठक यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रशासकासोबतच आरबीआयकडून सल्लागारांची समिती देखील नियुक्त करण्यात आलेली आहे. संचालक मंडळाकडून खराब प्रशासन मानकांमुळे ही कारवाई करणे आवश्यक असल्याचं आरबीआयने सांगितले आहे.

दरम्यान, आरबीआयकडून बँकेवर कोणतेही व्यावसायिक निर्बंध घातलेले नाहीत. त्यामुळे बँकेचे व्यवहार सुरळीत राहणार आहेत. त्यामुळे ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# पाणी सोडण्याच्या हालचालींना वेग

## जायकवाडी धरणात सोडले जाणार ८.५ टीएमसी पाणी

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर : सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर आता उत्तर महाराष्ट्रातील धरणातील पाणी मराठवाड्याला सोडण्यासाठी प्रशासनाकडून तयारी सुरू करण्यात आली आहे. मात्र, पाटबंधारे विभागाला पाणी सोडण्याबाबत अद्याप कोणतेही पत्र मिळाले नाही. तर, दुसरीकडे पाणी सोडताना कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी देखील पोलीस विभागासोबत पत्रव्यवहार सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.**

**पाणी सोडल्यास न्यायालयाचा अवमान : आमदार आशुतोष काळे**

जायकवाडी धरणात नगर – नाशिक जिल्ह्यातील धरणातून पाणी सोडण्याचा शासकीय धुरीनांनी घेतलेला निर्णय न्यायालयाचा अवमान करणारा असेल, असे वक्तव्य पत्रकार परिषदेत आ . आशुतोष काळे यांनी केले . आ . काळे पुढे म्हणाले की, शासनाने जायकवाडी धरणात पाणी सोडण्याचा घेतलेला निर्णय न्यायालयाचा अवमान करणारा असेल . न्यायालयाने पाणी सोडावे असे कुठेही म्हटले नसतांना मराठवाड्यातील नेते मंडळींनी सोईचा अर्थ घेवुन समन्यायी कायद्याचा घेतलेला आधार हा कालबाह्य असुन जायकवाडीत सद्यस्थितीत असणाऱ्या पाण्याचा कुठलाही हिशोब पाटबंधारे विभाग कागदपत्री दाखवत नसल्याने जायकवाडी साठी पाणी सोडण्याचा घेतलेला निर्णय हा दबावा पोटी घेतला आहे . यामुळे नाशिक – नगर जिल्ह्यातील शेती व उद्योग व्यवसाय उद्ध्वस्त करणारा असेल, असे सांगत आ . काळे यांनी सांगत खंडपीठात दाखल केलेल्या अवमान याचीकेची पुढील सुनावणी बारा डिसेंबरला ठेवण्यात आलेली आहे . पाणी सोडण्याच्या निर्णयावर सुप्रीम कोर्टात देखील गेलेलो असुन शासनाने २०१६ ला जायकवाडीसाठी सोडलेल्या पाण्यामुळे न्यायालयाचा अवमान झाल्याची याचिका दाखल आहे का, यावर विचारणा केलेली आहे . सद्यस्थितीत पाण्याचा काटकसरीने वापर करावा लागणार आहे . वरील धरणातील पाणी हे आमच्या हक्काचे असुन नगर नाशिक जिल्ह्यातील सर्व नेत्याचा पाणी सोडण्यास सक्त विरोध असल्याचे सांगत अधिकाऱ्यांनी दबावाखाली निर्णय घेतल्यास तो न्यायालयाचा अवमान असेल , असे शेवटी त्यांनी सांगितले .


अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील धरणांचे पाणी मराठवाड्याला सोडण्याबाबत वाद पेटलेला होता. दरम्यान जरी मराठवाड्याला पाणी सोडण्याचे आदेश पाटबंधारे विभागाला प्राप्त झाले नसले तरी प्रशासनाकडून तयारी सुरु झाली आहे. स्थळ पाहणी करण्यासाठी प्रशासनाकडून पाच टीम तयार करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पाणी सोडण्यावरून सुरू असलेला वाद लक्षात घेऊन पाणी सोडण्याचे आदेश आला तर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी कलम 144 लावण्यासाठी पाटबांधारे विभागाकडून पोलीस विभागासोबत पत्रव्यवहार सुरू आहे, अशी माहिती कार्यकारी अभियंता सायली पाटील यांनी दिली आहे. सोबतच शटडाऊन घेण्याबाबत महावितरण सोबत देखील पत्रव्यवहार सुरू असल्याचे पाटील यांनी सांगितले. उत्तर महाराष्ट्राच्या धरणातून जायकवाडीला पाणी सोडलं जाणार आहे. उच्च न्यायालयाचा निर्णय सुप्रीम कोर्टाकडून कायम ठेवला आहे. उत्तर महाराष्ट्राच्या धरणातून आता जायकवाडी धरणात 8.5 टीएमसी पाणी सोडलं जाणार आहे.

## चीनमध्ये आणखी एका रोगाची दहशत; मुलांमध्ये श्वसनाच्या तक्रारी

आधुनिक केसरी न्यूज

नवी दिल्ली : चीनमध्ये H9N2 चा प्रादुर्भाव वाढला असून तेथील लहान मुलांमध्ये श्वसनाच्या तक्रारी वाढल्या आहेत. करोनाप्रमाणे हा सुद्धा संसर्गजन्य आजार असल्याने भारतीय नागरिकांमध्येही घबराट निर्माण झाली आहे. परंतु, केंद्र सरकारने दिलासा दिला आहे. चीनमध्ये आढळललेले एव्हीयन इन्फ्लूएन्झा (H9N2) चा भारताला कमी धोका असल्याचं केंद्र सरकारने म्हटलं आहे. उत्तर चीनमधील मुलांमध्ये श्वसनाचा आजार वाढला आहे. याबाबत जागतिक आरोग्य संघटनेने एक निवेदन देखील जारी केले आहे. सध्या उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे, चीनमध्ये गेल्या काही आठवड्यांमध्ये श्वसनाच्या आजारांच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. चीनमध्ये ऑक्टोबर २०२३ मध्ये H9N2 (एव्हियन इन्फ्लूएन्झा विषाणू) चा संसर्ग एका व्यक्तीला झाल्याचे आढळून आले. त्यानंतर हा संसर्ग वाढत गेला. परिणामी, या आजाराविरोधात लढण्यासाठी आरोग्य सेवा महासंचालनालयाच्या अध्यक्षतेखाली चीनमध्ये नुकतीच एक बैठक आयोजित करण्यात आली होती. याचा अहवाल जागतिक आरोग्य संघटनेला देण्यात आला. आरोग्य संघटनेने केलेल्या एकूण जोखीम मूल्यमापनात त्यांच्याकडे आतापर्यंत नोंदवलेल्या H9N2 च्या मानवी प्रकरणांमध्ये मनुष्याकडून दुसऱ्या मनुष्याकडे संसर्ग पसरण्याची शक्यता कमी असून मृत्यूचे प्रमाण कमी असल्याचे आढळले आहे. म्हणजेच, या आजाराचा संसर्गजन्य दर आणि मृत्यूचे प्रमाण कमी आहे. भारत कोणत्याही प्रकारच्या सार्वजनिक आरोग्य परिस्थितीसाठी तयार आहे. अशा सार्वजनिक आरोग्य समस्यांचे निराकरण करण्याच्या दिशेने एक समग्र आणि एकात्मिक रोडमॅपचा अवलंब करण्यासाठी भारत सरकार कटिबद्ध आहे, असे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने जाहीर केलं आहे. कोविड महामारीनंतर आरोग्याच्या पायाभूत सुविधांमध्येही वाढ झाली आहे. पीएम-आयुष्मान भारत हेल्थ इन्फ्रास्ट्रक्चर मिशन हे पंतप्रधानांनी सुरू केले होते. यामुळे आरोग्य प्रणाली तयार करण्यासाठी प्राथमिक, माध्यमिक आणि तृतीय श्रेणीतील सर्व स्तरांवर आरोग्य यंत्रणा आणि संस्थांची क्षमता विकसित करता येते.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

रात्रीचं आकाश काही नेहमीच काळ्याकुट्ट ढगांनी व्यापलेलं नसतं, मधूनच का होईना पण दिसणारा पौर्णिमेचा चंद्र आपल्याला उल्हसित करतो. आकाशातल्या तारका त्याही परिस्थितीत चमकत असतात.त्या जणू म्हणतात की बघा भवतालची परिस्थिती कशीही असो आम्ही त्यातही आपल्या तेजाने सभोवताल उजळण्याचा प्रयत्न करत आहोत. उंबरठा चित्रपटातलं गाणं फार सुंदर आहे. सुन्या सुन्या मैफलीत माझ्या तुझेच मी गीत गात आहे अजूनही वाटते मला की अजूनही चांदरात आहे.... खरं तर मैफल कधीच सुनी नसते. भवतालची परिस्थिती कितीही निराशाजनक असू द्या. आपल्या अवतीभवती चंद्रतारे असतातच. फक्त आपल्याला ते पाहण्याची दृष्टी पाहिजे. मग गीत मनातून आपोआपच फुलतं. शब्द ओठांवर येतात, ' अजूनही चांदरात आहे...' कालचीच गोष्ट...! दुपारी चार साडेचारचची वेळ असेल. मस्त झोप झाली होती. बाहेर येऊन बसलो. हातात वाचण्यासाठी एक पुस्तक होते. पण पुस्तक उघडण्याआधी बाहेरचे निसर्गाचे उघडे पुस्तक वाचू लागलो. ते अत्यंत विलोभनीय होते.

हिवाळा संपण्याच्या उंबरठ्यावर आणि उन्हाळा सुरु होण्याच्या प्रतीक्षेत होता.. असा हा काळ. छानपैकी वारा सुटला होता. वाऱ्याच्या झुळकीत हिवाळ्याचा सुखद गारवा होता. अंगाला मुलायम रेशमी मोरपिसाचा स्पर्श व्हावा तसा तो अंगाला स्पर्शून जात होता. काही न करता येथे असेच बसून राहावे आणि हे सुखद वारं अंगावर घेत राहावं असं वाटत होतं . तसाच काही काळ बसलो. मग वर आकाशाच्या विस्तीर्ण पटावर एक नजर टाकली. किती सुंदर दिसत होते आकाश...! अथांग निळाई पसरलेली. केवढा विस्तीर्ण पट ! मध्येच एक चुकार सावळा मेघ जागा व्यापून होता. बाकी सगळे आकाश निरभ्र. मनात विचार आला की आपलं मनसुद्धा असं आकाशासारखंच आहे नाही ? आकाशाला कुठे सीमा ? कुठे सुरु होते आणि संपते कळत नाही. वर डोक्यावर आकाशाचा विस्तीर्ण मंडप. क्षितिजापाशी तो झुकलेला. पण जिकडे पाहावं तिकडे आकाशच..! मानवी मन सुद्धा असंच आहे. त्यालाही सीमा नाही. आदी आणि अंत नाही. आपण सगळेच कधीतरी समुद्रावर गेले असू. समुद्राच्या काठावर बसलो की समुद्रही असाच विशाल भासतो नाही का ? जिकडे नजर जाईल तिकडे तो पसरलेला. अथांग निळाई.



## आनंदी पहाट

## व्यक्तीनिष्ठ कल्याणाचे उद्दिष्ट आणि फायदे

आधुनिक केसरी

प्रत्येकाच्याच जीवनात चढ-उतार असतात, परंतु कधीकधी आव्हानात्मक घटना एकाच वेळी घडतात. जेव्हा आपले जग उलथापालथ होते, तेव्हा आनंदाची कमतरता जाणवणे साहजिकच असते. आरोग्य समस्या, तोटा, ब्रेकअप, गृहनिर्माण आव्हाने, नैसर्गिक आपत्ती - गंभीर तणाव आणि क्लेशकारक घटनांची यादी मोठी आहे. बहुतेक प्रौढांना त्यांच्या संपूर्ण आयुष्यात अनेक गंभीर आघात आणि नुकसान अनुभवावे लागतात. ह्या संदर्भात आनंद गमावणे हा मानवी अनुभवाचा एक नैसर्गिक भाग आहे. तथापि, काही लोकांसाठी, आनंदाची कमतरता कायम राहते. काहीवेळा हे डिप्रेशन एखाद्या मूड सारख्या डिसऑर्डरमध्ये होऊ शकते. आनंद अनुभवण्याची असमर्थता (ज्याला एनहेडोनिया देखील म्हणतात) नैराश्याच्या निदान निकषांचा एक भाग आहे आणि हे अगदी सामान्य असते. अनेकदा प्रौढांना आयुष्यात नैराश्याचा अनुभव येतो आणि काही लोकांना त्यांच्या ऐन तारुण्याच्या जीवनकाळात नैराश्याचा अनुभव येऊ शकतो. मनोविकार आणि स्मृतिभ्रंश यासह इतर मानसिक आजारांसह आनंद कमी होणे देखील असू शकते. उदासीनतेवर उपचार करणाऱ्या औषधांसह काही औषधे देखील भावनिक बोथट आणि आनंद गमावू शकतात. अनेकदा, काही लोक आनंदाचा विचार असा करतात की स्वतःला आनंद देणारी भावना - उबदार अस्पष्टता आणि मणक्याला मुंग्या येणे या संवेदना ज्या त्या क्षणी फक्त स्वतःला आनंद देतात त्या क्षणी त्यांना यश प्राप्त झाल्याचा भास होतो. आनंदी राहण्याचे आश्चर्यकारक फायदे दर्शविणारे विज्ञान वाढत आहे. हे जीवनातील अनेक महत्त्वाच्या पैलूंवर प्रकाश टाकते आणि आपल्याला अनेक प्रकारे मदत करते. आपण आनंदी राहण्याच्या सर्व सकारात्मक फायद्यांचे व्यक्तिनिष्ठ कल्याणाचे उद्दीष्ट आणि फायदे; या विषयावर पुनरावलोकन केले पाहिजे. ह्यामुळे परस्परांतील नाते सुधारू शकते. लोकांना आनंदी लोकांभोवती राहणे आवडते, आनंदी लोक इतरांना अधिक आनंद देतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## भक्तास ह्या तारी | माय अंबे ||

जागराला आलो | तुझ्या अंबाबाई ||
गोंधळाची | घाई मना लागे ||१||
उदो उदो अंबे | मंत्र संजीवन ||
परडीत धन | पुण्याईचे ||२||
कवड्याची माळ | लाभले वैभव ||
विकारी दानव | थरारले ||३||
नाचविता पोत | आनंदले मन ||
पाशाचे बंधन | मुक्त झाले ||४||
होऊनी निस्संग | आलो तुझ्या दारी ||
भक्तास ह्या | तारी माय अंबे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी

तये भार्येचेनि कैवारें ।मायेबापासीं नीच उत्तरें ।
बोलोनियां तिरस्कारें ।वेगळा निघे ।४९ ॥
स्त्रीकारणें लाज सांडिली ।स्त्रीकारणें सखीं सोडिलीं ।
स्त्रीकारणें विघडिलीं ।सकळहि जिवलगें ॥५० ॥
स्त्रीकारणें देह विकिला ।स्त्रीकारणें सेवक जाला ।
स्त्रीकारणें सांडविला ।विवेकासी ॥५१ ॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

जीवन पथ का प्राण है, और ज्योति परकाश ।
बोध पाय नहिं त्यागिये, सत्संगति भ्रम नाश ।।५२।।(स्वर्वेद पंचम मण्डल पंचम अध्याय) ०५/०५/५२

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
सत्संग हा जीवन पथाचा प्राण तसेच ज्योती आहे. ज्ञान झाल्यावर सत्संगाचा त्याग करू नये कारण सत्संगाच्या प्रकाशामुळेच भ्रम अंधःकाराचा नाश होतो.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

.................................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## समर्थ रामदास

"शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे। वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचे। कवी वाल्मिकासारिखा मान्य ऐसा। नमस्कार माझा सद्गुरू रामदासा।।" हा श्लोक वामन पंडितांनी समर्थ रामदासांना उद्देशून लिहिला आहे.




समर्थ रामदास हे निसर्गप्रेमी होते. त्यांनी आपल्या निवासाच्या ज्या जागा निवडल्या त्या सर्व निसर्गरम्य जागा होत्या. आजही चाफळ, शिवथरघळ, सज्जनगड आणि समर्थांच्या वेगवेगळ्या घळी पाहण्यासाठी तरुण गिर्यारोहक गर्दी करतात. काही साहसी तरुण मुले मुद्दाम पावसाळ्यात मोहीम म्हणून समर्थांची तीर्थक्षेत्रे पाहतात. समर्थांना अंगापूरच्या डोहात दोन मूर्ती सापडल्या; एक श्रीरामचंद्रांची आणि दुसरी तुळजाभवानीची. त्यांतील श्रीरामाची मूर्ती त्यांनी चाफळला स्थापन केली. श्री तुळजा भवानीची मूर्ती स्थापन करण्यासाठी ते सज्जनगडावर आले. सज्जनगडावरील प्रसिद्ध अंग्लाई देवीचे मंदिर आजही याची साक्ष देत आहे.

## भगवंत हा प्रपंचासाठी साधन बनवू नये

आधुनिक केसरी

एक मुलगा घरातून पळून गेला. तेव्हा त्याची आई म्हणाली, 'तो कुठेही राहू दे, पण खुशाल असू दे.' तसे, तुम्ही कुठेही राहा पण नामात असा. नाम तेवढे बळजबरीने घ्या. श्रद्धेने घेतले तर जास्त बरे; वृत्ती सांभाळून नामात राहिलात तर त्याहूनही जास्त बरे ! वनस्पतीच्या पाल्याचा रस काढण्यासाठी काही पाल्यांमध्ये मध घालावा लागतो, काहीमध्ये दूध, तूप किंवा पाणी घालावे लागते. तसे भगवंताचे प्रेम लाभण्यासाठी आणि नामात गोडी उत्पन्न होण्यासाठी, त्या नामामध्ये थोडी श्रद्धा घाला. ' मी ब्रह्म आहे ' या अनुभवातसुद्धा मीपणा आहे. नाम त्याच्याही पलीकडे आहे. म्हणून भगवंताच्या नामाचे सतत स्मरण ठेवावे; त्यामुळे प्रपंच सोपा जातो. नामाची सत्ता फार बलवत्तर आहे. जगात असे कोणतेही पाप नाही की जे नामासमोर राहू शकेल. नाम हे त्याच्या शत्रूलाही मदत करते, तर ते आपल्याला मदत करीलच. रूपाचे ध्यान मनामध्ये आले नाही तरी नाम सोडू नये. पुढे रूप आपोआप येऊ लागेल. सत्याला काही रूप दिल्याशिवाय



आज आपल्याला त्याचे अनुसंधान ठेवता येत नाही. नाम हे त्याचे रूप आहे, म्हणून नामाचे सतत अनुसंधान ठेवावे. भगवंताच्या नामात मोबदल्याची अपेक्षा नाही, म्हणून ते अपूर्ण नाही. अडाणी लोकांना नाम घ्यायला सांगितले तर ते लगेच घेणे चालू करतात, परंतु विद्वान् लोक मात्र ' नामाचे प्रेम असेल तरच मी नाम घेईन ' असे म्हणतात. विषयरूपी सापाचे विष उतरलेले नसल्याने भगवंताचे अमृतासारखे गोड नाम आपल्याला गोड लागत नाही. याकरिता या क्षणापासूनच नाम घ्यायला सुरुवात करावी. आपण रामाचे व्हावे आणि त्याला जे आवडते ते करावे. रामाला जाणतेपणाने शरण न जाता नेणतेपणाने शरण जावे. भगवंताला अनन्य शरण जाऊन अनुभव घ्यावा. नीतीने वागावे, भक्ती चांगली करावी, मग राम प्रसन्न होतो. ज्ञान श्रेष्ठ खरे, पण ते भक्तीशिवाय जगू शकत नाही; कारण भगवंताहून कधी विभक्त नसतो तो भक्त होय, आणि ज्ञानामध्ये भगवंताशी एकरूपत्व असते; म्हणून भक्तीमधून ज्ञान उत्पन्न होते आणि ते भक्तीवरच जगते. खरा भक्त ज्ञानीच असतो. भगवंतासाठी भगवंत पाहिजे म्हणून भक्ती करणारा लाखांमध्ये एखादाच असतो. खरी भक्ती ती हीच समजावी. नामाकरिता आपण नाम घ्यावे; राम ठेवील त्यात समाधान मानावे. भगवंत हा प्रपंचासाठी साधन बनवू नये, तो साध्य असावा. ज्याने भगवंताच्या नामात आपल्या आयुष्याचा व्यय केला, त्याने जन्माला येऊन सर्व काही साधले आणि जन्माचे सार्थक करून घेतले.

## शुन्यत्वनिरसन

आधुनिक केसरी

परिस्थितीत ते हतबल झालेले पहातो. म्हणजेच, वेडा साधक शून्यातून ब्रम्ह समजतो. जन्माला आला त्यावेळी ही शून्य व आता शेवटच्या क्षणी पण शून्य म्हणजेच मला असे सांगायचे आहे की , जीवनात प्रवेश करते वेळी आपण शून्य असतो मरते वेळी पण शून्य असतो. पण या जीवन मरणाच्या मधला जो काही काळ आहे ना तो आनंदाने सात्विकता जोपासुन केला तर मरणाचे भय रहात नाही. सगळे दृष्य ओलांडले म्हणजे अदृष्य शिल्लक रहाते ते शून्यरूप आहे. आणि ते शून्यच ब्रम्ह आहे असे समजून साधक मागे जातो. खरंतर कडेला दृष्य विश्व आहे.त्या कडेला परब्रह्म आहे आणि या दोन्हींच्या मध्ये शून्यातून स्थान आहे. साधना मार्गातील लोक यालाच ब्रम्ह समजतात.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646




संविधानाचा स्विकार झाला पुढे काय..? पान ६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, २५ नोव्हेंबर २०२३



ये रास्ते हैं प्यार के चलना संभल संभल के... पान ७

# आरक्षणावरुन सुरु असलेला धुमाकूळ थांबवावा

## नाना पटोले : मराठा-ओबीसी वाद सरकार प्रायोजित, भुजबळांच्या मागे भाजपाचीच शक्ती

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राज्यात मागील काही दिवसांपासून सुरु असलेला मराठा विरुद्ध ओबीसी हा वाद जाणीवपूर्वक घडवून आणला जात आहे. भाजपाने मराठा, ओबीसी, धनगर समाजाला जी आश्वासने दिली ती पूर्ण करावीत. कोणाच्या तोंडचा घास हिसावून घेणार नाही हे सरकार म्हणत आहे तर सरकार नेमके काय करणार हे जनतेसमोर स्पष्ट करावे. पण सरकारची भूमिकाच स्पष्ट नाही. दोन्ही समाजात सुरु असलेला वाद हा सरकार प्रायोजित असून आरक्षणावरुन सुरु असलेला हा धुमाकुळ सरकारने थांबवावा, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.

नागपूर येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, राज्यात बेरोजगारी, महागाई व शेतकऱ्यांचे प्रश्न महत्वाचे आहेत पण सरकार त्याकडे लक्ष देत नाही. सरकारला शेतकरी, बेरोजगार तरुण, सर्वसामान्य जनतेच्या भावना कळत नाही पण जनतेला भेडसावत असलेले मुळ प्रश्न काँग्रेससाठी महत्वाचे आहेत. कोण काय बोलतो हे काँग्रेस व महाराष्ट्रातील जनतेसाठी महत्वाचे नाही व त्यात कोणाला स्वारस्य नाही. भाजपा हा आरक्षण विरोधी पक्ष असून देशाचे पंतप्रधानच गरिबी ही जात असल्याचे सांगून आरक्षण संपवण्याचा प्रयत्न करत आहेत. आरक्षणप्रश्नावर काँग्रेसची भूमिका स्पष्ट असून जातनिहाय जनगणना केल्यास मराठा, ओबीसी, धनगर समाजासह सर्व समाजाच्या आरक्षणाचे प्रश्न सुटू शकतात. काँग्रेस सत्तेत आल्यास तसा निर्णय घेतला जाईल असे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे व राहुल गांधी यांनी आधीच स्पष्ट केले आहे.

**महाराष्ट्राने काय पाप केले आहे का?**



राजस्थान व छत्तिसगडमध्ये भाजपाचे सरकार आल्यास ४५० रुपयांना गॅस सिलिंडर देणार अशी मोठी जाहिरातबाजी भारतीय जनता पक्षाने केली आहे. भाजपाचे मोठे नेतेही ४५० रुपयांमध्ये सिलिंडर देण्याची भाषा करत आहेत. महाराष्ट्रात सध्या भाजपाचेच सरकार आहे मग भाजपा सरकार महाराष्ट्रात ४५० रुपयांना सिलिंडर देत का नाही? महाराष्ट्रातील जनतेने काय पाप केले आहे का? ही सर्व बनवाबनवी आहे, उज्ज्वला गॅस योजनेत केवळ २० टक्के सिलिंडर रिफील केली जातात ही योजना फेल गेली आहे पण उज्वला योजनेच्या नावाखाली गरिबांना मिळणारे केरोसिन मात्र भाजपा सरकारने बंद केले आहे. नफा कमावणे हे सरकारचे काम नाही पण २०१४ पासून सरकार नफा कमावण्याचे काम करत आहे, जनतेची लूट करुन नफा कमावणे हे भयावह आहे.

**'पनवती' ट्विटवर एवढा वाद कशाला?**

एका प्रश्नाला उत्तर देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आम्ही पनवती म्हटलेले नाही. ते देशाचे आदरणीय पंतप्रधान आहेत. सोशल मीडियावर पनवती हा शब्द मागील दोन तीन दिवसांपासून ट्रेंड होत आहे, पनवती म्हणजे अहंकार व हा अहंकार म्हणजे पनवती गेली पाहिजे अशी सर्वांची भूमिका आहे, तोच संदर्भ ट्विटमध्ये आहे. भाजपा ते स्वत:वर घेत असतील तर तो त्यांचा प्रश्न आहे, असा टोलाही पटोले यांनी लगावला.



# बाजारसावंगी येथे भक्तफेरी, अनेक भाविकभक्त सहभागी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे जगदगुरु जनार्दन स्वामी यांचे पुण्यस्मरण दिनानिमित्त भक्तफेरी काढून मार्गदर्शन कार्यक्रम दि.२३ घेण्यात आले.

जगदगुरु जनार्दन स्वामी यांचे ३४पुण्यस्मरण तथा जय श्रीराम निष्काम कर्मयोगी धर्मसोहळा दि.१७ डिसेंबर ते २४ डिसेंबर २०२३. कुंभमेळा मैदान तपोवन नाशिक शहर स्थळी घेण्यात येणार असुण त्या निमित्ताने बाजार सावंगी शाखा जय बाबाजी भक्त मंडळ कडून गाव परिसरात भक्त फेरी काढुन कामा बाबत भाविक भक्तांना मार्गदर्शन करण्यात आले.

जयबाबाजी भक्त मंडळाचे विश्वानाथ नलावडे, चेअरमन किशोर नलावडे, संतोष नलावडे,रावसाहेब नलावडे, पंडितराव नलावडे, बाबासाहेब नलावडे,अजीनाथ नलावडे, आनंदा काटकर,रामदास पुंड,अशोक धुमाळ, सर्जेराव काटकर,अजिनाथ काटकर सह मोठ्या संख्येने जयबाबाजी भक्त मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते महिला पुरुष तरुण तरूणी भाविक उपस्थित होते.

# नेरुळ उड्डाणपुलावर भीषण अपघात

## दोघांची प्रकृती अत्यंत चिंताजनक

आधुनिक केसरी न्यूज

**नवी मुंबई :** नवी मुंबई मनपा मुख्यालय इमारती समोर असणाऱ्या उलवा उड्डाणपुलावर पावणे दहाच्या सुमारास कार आणि ट्रकचा भीषण अपघात झाला. अपघातात कार मधील दोघांची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे.आज रात्री पावणे दहाच्या सुमारास उलवेकडून नेरुळच्या दिशेला भरधाव वेगाने येणाऱ्या कार चालकाने समोरील ट्रेकला मागून जोरदार धडक दिली. अपघात एवढा भीषण होता की कारचे बोनेट आणि समोरील केबिन पूर्णपणे दबले गेले आहे. अपघात बाबत माहिती मिळताच एनआरआय पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

या अपघातात कार मध्ये पुढे बसलेल्या दोघांची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे. अद्याप कोनाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला नाही . जखमींना नजीकच्या रुग्णालयात दाखल केले आहे. त्यांची ओळख अद्याप पटलेली नाही. अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद तोरडमल यांनी दिली.

# परतूर तालुक्यातील रुग्णांचे होणारे हाल आता थांबणार

## आमदार लोणीकरांनी केला होता पाठपुरावा

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :**येथे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाला मंजुरी मिळाली असून, माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे.

गेल्या पाच वर्षापासून माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी, परतूर येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून १०० खाटांच्या रुग्णालयाचा दर्जा परतूर ग्रामीण रुग्णालयाला मिळाला असून, यामुळे ग्रामीण भागातील जालना परभणी कडे जाणाऱ्या गंभीर रुग्णांना परतूर शहरातच उच्च दर्जाचे उपचार उपलब्ध होणार आहेत अशी माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात दिली आहे.

पुढे या पत्रकार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे की, परतूर येथे या सुविधा उपलब्ध नसल्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता, परतूर तालुक्यातून व शहरातून दोन राष्ट्रीय महामार्ग जातात त्यामध्ये छत्रपती संभाजी नगर जालना परभणी नांदेड हा एक महामार्ग असून दुसरा महत्त्वपूर्ण शेगाव पंढरपूर दिंडी मार्ग असल्यामुळे या महामार्गावर मोठ्या प्रमाणावर अपघात होत असतात त्यामुळे गरजू रुग्णांना अपघातग्रस्तांनाआपले प्राण गमवावे लागत होते गंभीर अपघातामुळे थेट जालना इथपर्यंत पोहोचेपर्यंत अनेक अपघात ग्रस्थाना प्राण गमावत होते मात्र आता परतूर येथेच उच्च दर्जाचे उपचार उपलब्ध झाल्यामुळे, गरजू रुग्णांना या गोष्टीचा मोठा फायदा मिळणार असल्याचे या पत्रकार आमदार लोणीकर यांनी नमूद केले आहे.

कोरोना काळामध्ये परतुर येथे कोरोणा रुग्णांना उपचार न उपलब्ध झाल्यामुळे अनेकांना आपले प्राण गमवावे लागले होते या पार्श्वभूमीवर उच्च दर्जाच्या सुविधा आता परतूर शहरात मिळणार असल्याने, सर्वसामान्य जनतेला याचा मोठा फायदा होणार असल्याचे या पत्रकात आमदार लोणीकर यांनी नमूद केले आहे.

ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेला जिल्हा रुग्णालय जालना येथे जाण्यासाठी अधिक खर्चाची बाब होती, अनेकांना या गोष्टीचा खूप मोठा त्रास होत होता या पार्श्वभूमीवर गेल्या ०५ वर्षापासून आपण परतूर येथे सुसज्ज असे उपजिल्हा रुग्णालय निर्माण करण्यात यावी यासाठी प्रयत्न करत होतो आपण केलेल्या प्रयत्नाला यश आले असून, उपजिल्हा रुग्णालयाला मंजुरी दिल्याबद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांना धन्यवाद आमदार बबनराव लोणीकर यांनी दिले असून, लवकरच सर्व सुविधा परतुर उपजिल्हा रुग्णालयात उपलब्ध होतील असेही यावेळी पत्रकात आमदार लोणीकर यांनी सांगितले.



# राऊत यांचा टोला

आधुनिक केसरी

एकनाथ शिंदे गट आणि अजित पवार गट हे भाजपात विलीन होऊन कमळ चिन्हावर निवडणूक लढवतील. त्यांनी स्वतःला कितीही पदव्या लावून घेतल्या तरी काही उपयोग नाही. राजस्थान, मध्यप्रदेश तिथे जाऊन प्रचार करत आहेत. उद्या एकनाथ शिंदे जो बायडेनच्या प्रचारालाही जाऊ शकतात, कारण ते महान नेते आहेत. इतके महान नेते या राज्यात निर्माण झाले नाहीत. २०१४ नंतर भाजपाने असे अनेक नेते दुसऱ्या पक्षातून घेऊन तयार केले पण हे तात्पुरते आहेत. एवढंच नाही तर देशाला २०१४ मध्ये पनवती लागली जी २०२४ मध्ये संपणार आहे असाही टोला संजय राऊत यांनी लगावला. एकनाथ शिंदे हे हिंदूहृदय सम्राट असतील पण त्यांनी असं काय महान कार्य केले आहे ते आम्हाला पाहावं लागेल. सन्मानीय हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्याबरोबर काम केलं आहे. आम्ही त्यांचा संघर्ष पाहिला. बाळासाहेबांनी कधीही सत्तेसाठी तडजोडी केल्या नाहीत, बेईमानी केली नाही. आता बेईमान आणि गद्दारांना हिंदूहृदय सम्राट म्हणण्याची परंपरा नव्या हिंदुत्वात सुरु झाली असेल तर पहावे लागेल असेही संजय राऊत यांनी म्हटलं आहे. राजस्थान भाजपाला महाराष्ट्रात काय चाललंय हे कुठे ठाऊक आहे? एकनाथ शिंदे तिथे खोके घेऊन प्रचाराला गेले असतील. महाराष्ट्रात अशा पदव्या लावण्याची हिंमत नाही कारण लोक जोड्याने मारतील. महाराष्ट्रात ज्यांना पनवती समजले जाते ते बाहेर जाऊन हिंदुत्वाचा प्रचार करतात. हिंदूहृदयसम्राट या देशात दोनच आहेत, एक स्वातंत्र्यीवर सावरकर आणि दुसरे बाळासाहेब ठाकरे त्यानंतर कुणीही ही पदवी घेऊ शकत नाही. कारण त्यांचा संघर्ष आणि काम खूप मोठे होते असेही संजय राऊत म्हणाले आहेत. महाराष्ट्राची पनवती असलेले एकनाथ शिंदे बाहेर प्रचाराला जात आहेत. ते महाराष्ट्रातही हरणार आणि बाहेरही. २०१४ पासून देशाला पनवती लागली आहे. खासकरुन जे स्वतःला हिंदुत्व समजत आहेत त्यांना पनवती शब्दाबाबत अडचण वाटायला नको. जरा या शब्दाचा अर्थ समजून घ्या. भाजपाला या शब्दाचा राग यायला नको. २०१४ ला लागलेली पनवती २०२४ ला दूर होणार आहे. कधी साडेसाती लागते त्यानंतर पनवती लागते, त्यानंतर छोटी पनवती लागते. ही सगळी हिंदुत्वाची संकल्पना आहे. पनवतीचा अभ्यास हिंदुत्ववाद्यांनी करावा. चार दिवसांमध्ये काश्मीर खोऱ्यात दोन कॅप्टनसह चार जवानांना बलिदान द्यावे लागले. याबाबत कुणीही संवदेना व्यक्त केली नाही. केंद्र सरकार पाच राज्यांमध्ये निवडणुका लढवण्यात दंग आहे. त्यांना काँग्रेस मुक्त भारत आणि शिवसेना मुक्त महाराष्ट्र करायचा होता पण ते झाले नाही.

# संविधानाचे रक्षण करणे काळाची गरज



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**आज २६ नोव्हेंबर 'संविधान दिन' म्हणून जिकडे तिकडे उत्साहाने साजरा केला जातो. पण आज महाराष्ट्रातलेच नव्हे तर देशातले वातावरण प्रचंड गढूळ झाले आहे.जिकडे तिकडे धार्मिक आणि जातीय उन्माद फार बोकाळला आहे.ज्यांना आम्ही निवडून दिले आहे ते लोकप्रतिनिधी आणि राजकीय पक्षांचे कार्यकर्ते काहीही वाट्टेल तसे बरळताना दिसत आहेत. भारतीय संविधानाची त्यांनी शपथ घेतली आहे. त्याची त्यांना मात्र कुठल्याही प्रकारची जाण आणि भान दिसत नाही.**

केवळ फक्त भोंगा आणि हनुमान चालीसा वाचा, कधीही देवळात जात नाहीत, देवाच्या पाया पडत नाहीत, ह्यांनी हिंदुत्व सोडलं, फक्त हिंदुत्वासाठी, आशा मुद्द्यावर राजकारण केले जात आहे. काहीजण तर मी किती प्रतिगामी आहे आणि ते किती खोटे पुरोगामी आहेत हे सांगण्याचा प्रयत्न करत आहेत नव्हे तर जणू काही त्यांची शर्यतच लागली आहे असे दिसते.त्यामुळे देशातले वातावरण प्रचंड दूषित झाले आहे. माणूस माणसाकडे द्वेष नजरेने पाहत आहे. यामध्ये मात्र ज्यांचे हातावर पोट आहे,गरीब आहेत अशी सामान्य जनता मात्र आगीत होरपळून निघावी तशी अनेक संकटात व समस्यात ती होरपळताना दिसत आहे.त्यांना खायला काही नाही.कामधंदे नाहीत.बेकारी वाढली आहे. सुशिक्षित बेरोजगारांना नोक-या नाहीत.तरुणांच्या हाताला काम नाही. महागाई प्रचंड वाढली.शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नाही. आरोग्याच्या सुविधा फार कमी आहेत. शाळा महाविद्यालयाची दैन्यावस्था, गोरगरिबांना शिक्षण नाही. खाजगीकरण होत आहे. अन्याय अत्याचार वाढले आहेत. कंत्राटी पद्धत आली आहे. असे अनंत प्रश्न तोंड वर काढत आहेत. त्यांचा विचार मात्र कुठल्याही लोकप्रतिनिधींना,राजकारण्यांना किंवा सरकारला नाही. ज्यांच्या जीवावर हे लोकप्रतिनिधी निवडून आले आहेत. ते मात्र सत्तेच्या जोरावर सत्तेसाठी मस्ती करताना दिसत आहेत. स्वार्थ आणि मतलबासाठी जनतेच्या प्रश्नांना बगल देताना दिसतात. संविधानाची पायमल्ली करताना दिसत आहेत आणि उलट तेच सविधानांवर बोलताना दिसत आहेत. सविधान मूल्य पायदळी तुडवताना दिसत आहेत. दिल्लीसारख्या ठिकाणी तर संविधान जाळले जाते आहे.ज्यांच्यामुळे आमचे कल्याण होणार आहे त्या संविधानाचे महत्व अजुनही सामान्य जनतेला माहित नाही.ते संविधानाबाबत आपल्या हक्क,कर्तव्याबाबत जागरूकही नाहीत. त्यामुळेच देशातील जातीय,धर्मवादी यांचे फावते आहे.जो तो धर्माचा वापर राजकारणासाठी करताना दिसतो आहे. सामान्य जनतेला मात्र यामध्ये विनाकारण गोवले जात आहे. त्यांना अत्यंत पद्धतशीरपणे यामध्ये वापरून घेतले जात आहे. त्याला अनेक जण बळी पडत आहेत. त्यामुळे तेही स्वतःच्या पायावर स्वतःचा धोंडा मारून घेत आहेत. अनेक जण तर सविधान साक्षरते पासून कोसो दूर असल्याने त्यांना मात्र मानवतेची,मूल्याची जाणच झालेली दिसत नाही. त्यामुळेच प्रत्येकाने भारतीय संविधान वाचणे आणि त्याची जपणूक करणे आज काळाची गरज निर्माण झाली आहे. 26 जानेवारी 1950 पासून आपल्या देशाने प्रजासत्ताक म्हणजे लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे. भारतीय संविधानाने एकंदरीत सर्व नागरिकांना  मूलभूत हक्क प्रदान केले आहेत. भारतीय संविधान म्हणजे जगातील समग्र मानव कल्याणकारी मूल्यांचा अर्क आहे. आजही आम्ही सविधानाकडे केवळ फक्त कायद्याचाच ग्रंथ आहे अशा मर्यादित अर्थाने पाहतो. डॉ.अनंत राऊत म्हणतात की,' संविधान हा आपला उदात्त असा सामाजिक व सांस्कृतिक दस्तावेज आहे.' मानवाला मानवी कल्याण साधायचे असेल तर प्रत्येकाने आपल्या जीवनामध्ये संविधानिक नैतिक मूल्यांची जोपासना करणे ही काळाची गरज आहे. मानवी जीवनामध्ये काही प्रजासत्ताक नैतिक मूल्यांची जोपासना करून जीवन जगले पाहिजे आणि इतरांनाही जगू दिले पाहिजे. मूल्य दोन प्रकारचे असतात एक चिरंतन मुल्य व दुसरे तात्कालिक मूल्य.तात्कालिक मूल्यामध्ये ईश्वरनिष्ठा, स्वामीनिष्ठा, आरत्या, धर्म, अंधश्रद्धा,जातीयता अशा प्रकारची मूल्य येतात. आपण भारतीय संविधानाचा स्वीकार केलेला आहे. त्यामुळे आपल्याकडे लोकशाही मूल्ये अस्तित्वात आहेत. लोकशाही मूल्यामध्ये राष्ट्रनिष्ठा, बुद्धिप्रामाण्यवाद, विवेकनिष्ठा,स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मूल्य येतात. लोकशाहीतील मूल्य ही चिरंतन मूल्ये आहेत.पण जे तात्कालिक मूल्य आहेत, जे टिकणारे नाहीत, ज्यामुळे मानवी कल्याण साधता येणार नाही अशा मूल्यांची पेरणी करण्याचा आणि आचरणात आणण्याचा प्रयत्न आजचा माणूस करताना दिसतो आहे. भरतीय संविधान एक संस्कार ग्रंथ आहे. त्यातील मूल्याची जपणूक प्रत्येकाने केली पाहिजे.त्याप्रमाणे वागले पाहिजे. त्याप्रमाणे शासन व्यवस्था चालली पाहिजे तरच खऱ्या अर्थाने समाजामध्ये अमुलाग्र बदल झाल्याशिवाय राहणार नाही. दुर्दैवाने आजचे आमचे लोकप्रतिनिधी व शासन चालवणारे अधिकारी संविधानाची अंमलबजावणी खऱ्या अर्थाने करताना दिसत नाहीत. उलट संविधानाची मोडतोड करून व्यवस्था बिगडविण्याचे म्हणजेच लोकशाही विरोधी काम करून लोकशाही संपविण्याचे काम ते जोरकसपणे करताना दिसत आहेत. भारतातील प्रजासत्ताक मूल्यांमध्ये स्वातंत्र्य हे मुल्य फार महत्त्वाचे आहे. हे मुल्य समाज जीवनातील आणि मानवी जीवनातील अत्यंत मूलभूत आणि चिरंतन असे मानवी मूल्य आहे. पण या मूल्याचा काहीजण अधिकाधिक वापर करून बलशाली होण्याचा प्रयत्न करून इतरांना दुबळे करण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत.' प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा संपूर्ण विकास करून घेण्याची समान संधी म्हणजे स्वातंत्र्य होय'.असे असतानाही सामाजिक स्वातंत्र्य,धार्मिक स्वातंत्र्य,राजकीय स्वातंत्र्य व आर्थिक स्वातंत्र्य यामध्ये काहींचे वर्चस्व आहे. गरीब गरीब होत चालला आहे. श्रीमंत श्रीमंत होत चालला आहे. त्यामुळे स्वातंत्र्याचा अर्थ मर्यादितच राहिला आहे तो सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला नाही, पोहोचविला नाही आणि पोहोचूही दिला जात नाही.  त्यामुळे शासनस्तरावरून त्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.  आपल्या देशात वर्णव्यवस्था ,जातीव्यवस्था आणि अस्पृश्यतेच्या माध्यमातून असंख्य लोकांचे आजही सामाजिक स्वातंत्र्य हिरावून घेतलेले दिसते. त्यामुळे भारत देशाचे खूप पुढे नुकसान झाले आहे. आजही या गोष्टी समाजव्यवस्थेमध्ये दिसून येतात. त्या हद्दपार करणे काळाची गरज आहे. माणसांनी निर्माण केलेल्या देवावर,धर्मग्रंथावर सर्वच माणसाला नैसर्गिक अधिकार असायला हवा. परंतु आपल्या देशामध्ये स्त्रियांना व शूद्रांना धर्मस्वातंत्र्य नाकारले होते. ज्ञान घेणे प्रत्येक माणसाचा नैसर्गिक हक्क जरी असला तरी स्त्रियांना -शूद्रांना वेद वाचण्याचे, ऐकण्याचे,बोलण्याचे स्वातंत्र्य नाकारले होते. धार्मिक स्वातंत्र्यावर बंधने लादल्यामुळे देशांत असंख्य माणसाना स्वतःचा विकास करून घेता आला नाही परूंतु भारतीय संविधानाने प्रत्येक व्यक्तीला ज्ञान मिळवण्याचे, धर्माची उपासना करण्याचे, धर्माचे ज्ञान मिळवण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. हुकूमशाही व राज्यशाही शासनव्यवस्थेत राज्यातील सर्वच व्यक्तींना राजकीय स्वातंत्र्य मिळत नाही. लोकशाही राज्यव्यवस्था मात्र प्रत्येक व्यक्तीला राजकीय स्वातंत्र्य देते.राजकीय स्वतंत्र्यामध्ये राज्यकर्ता निवडण्याचा अधिकार व्यक्तीला असतो. राज्य कारभारातही सहभागी होता येते. भारतीय संविधानामुळे विशिष्ट वर्ग,जात या वर्गातील व्यक्तीला दूर ठेवता येत नाही. मानवाला विकास करण्यासाठी आर्थिक स्वातंत्र्यही महत्त्वपूर्ण असते प्रत्येक नागरिकाला स्वतःच्या चरितार्थासाठी ,आर्थिक विकासासाठी स्वतःच्या कुवतीनुसार,निवडीनुसार उद्योग करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे पण पूर्वी जातिव्यवस्थेने हे स्वातंत्र्य नाकारले होते परंतु भारतीय संविधानाने मात्र ते स्वातंत्र्य प्रत्येक व्यक्तीला दिले आहे. त्याचा योग्य वापर करणे महत्त्वाचे आहे. समता हे श्रेष्ठ मानवी मूल्य म्हणून सर्वांनी स्वीकारले असले तरी आजही समता प्रस्थापित झालेली दिसत नाही. आजही अनेकांच्या मनामध्ये धर्म,जात,भाषा याची अडी दिसून यायला लागते. त्यामुळे आपल्या मनातील जातीय,धार्मिक,भाषिक अशा विविध स्वरूपाचा असलेला भेदभाव काढून टाकून प्रत्येकाने चांगले जगले पाहिजे, जगू दिले पाहिजे तरच प्रगती दिसून येईल. एका आईच्या पोटी जन्माला आलेली मुले एकमेकाशी अत्यंत प्रेमाने वागतात.अगदी त्याचप्रमाणे देशांमधील विविध जाती-धर्मांच्या माणसांनी एकत्र वागणे,राहणे, जगणे फार महत्वाचे आहे. परंतु तिरंगा झेंडा पाहिला की मातृभूमी बद्दलचा अभिमान आमच्यात भरून येतो. जागा होतो. हा दिवस सोडला तर आम्ही एकमेकांचे बांधव आहोत हे विसरून जातो धार्मिक,जातीय,भाषिक,प्रांतीय अस्मिता जागृत करतो हे वाईट आहे. त्यासाठी भारतीय राज्यघटनेतील समतावादी मुल्ये लोकमनावर खोलवर रुजविणे महत्त्वाचे आहे. भारतीय संविधानातील  बंधुत्व हे मूल्य सांस्कृतिक उपक्रम व प्रसारमाध्यमाद्वारे जनमानसात रुजविणे फार महत्त्वाचे आहे.त्यासाठी शाळा,महाविद्यालयातून,अभ्यासक्रमातूनही भारतीय संविधानाचा परिचय करून देणेही महत्त्वाचे आहे. न्याय हे मानवी जीवनातील अत्यंत महत्त्वाचे मूल्य आहे . अन्याय करणाऱ्या ज्या ज्या गोष्टी आहेत त्या त्या न्याय वाटत होत्या.उदाहरणार्थ बालविवाह,सती, विधवा पुनर्विवाह प्रथा. भारतीय संविधानाने मात्र त्यांना मूठमाती दिली. न्याय या मूल्यांना अनुसरून प्रत्येकाने वागलेच पाहिजे अशी भूमिका घेतलेली आहे. म्हणून न्याय प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येकाने न्यायाने वागले पाहिजे. खरेतर प्रत्येक भारतीयांनी भारतीय संविधानाच्या चौकटीत वागण्याचा प्रयत्न केला, प्रजासत्ताक मूल्यांची पेरणी करण्याचा प्रयत्न केला तर देशाचा कायापालट झाल्याशिवाय राहणार नाही यात तिळमात्रही शंका नाही. परंतु आज खाजगीकरण, आरक्षण गोंधळ, कंत्राटी पद्धती, अग्नीवीर योजना, नवीन शैक्षणिक धोरण,क्लस्टर पद्धती, शाळा बंद, जातीय,धर्मीय तेर वाढत आहे. अन्याय अत्याचार वाढले आहेत. अशा अनेक गोष्टीमुळे सामान्य माणूस, गरीब माणूस,दिन -दलित,आदिवासी, भटक्या समाजातील माणूस संपून जाणार आहे. त्यांचे जीवन उद्ध्वस्त होणार आहे. होरपळून निघणार आहे. हे त्यांनीही लक्षात घेऊन वाटचाल करणे गरजेचे आहे.  संविधान दिनाच्या निमित्ताने भारतीय संविधान,त्यातील नैतिक मूल्य  प्रत्येकाने समजून घ्यायलाच हवीत.त्यांची अंमलबजावणी करायला हवी तरच देश प्रगतीपथावर जाईल. म्हणून प्रत्येकाने संविधानाचे वाचन करणे आणि संविधानाचे संरक्षण करणे महत्त्वाचे आहे; अन्यथा येणाऱ्या काळात जीवघेण्या संकटांना अनेक दुःखांना सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे संविधानावर होत असलेले हल्ले प्रत्येक जाती धर्मातील सर्वांनी ते हल्ले परतवून लावले पाहिजेत. संविधान आपले नाही म्हणून गाफील राहू नका. सविधान हे सर्व माणसांच्या कल्याणाचा मार्ग आहे हे लक्षात ठेवा.

# महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, राष्ट्रीय राजकारणातील  द्रष्टे नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची आज पुण्यतिथी. आजच्याच दिवशी म्हणजे  २५  नोव्हेंबर १९८४ रोजी वयाच्या ७१ व्या वर्षी यशवंतराव चव्हाण यांचे निधन झाले. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२  मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या छोट्याशा गावातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात त्यांचा झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले, तर उच्चशिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले. पुण्यात त्यांनी बीए - एलएलबी चे शिक्षण पूर्ण केले. महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्य आंदोलनाने प्रेरित होऊन त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. १९३० साली त्यांनी महात्मा गांधीजींच्या सविनय आंदोलनात भाग घेतला. १९३२ साली त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला.**

सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. १९४६ साली मुंबई प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत दक्षिण सातारा मतदारसंघातून ते निवडले गेले आणि संसदीय मंडळाचे चिटणीस बनले. १९४८ साली त्यांची काँग्रेसच्या चिटणीस पदावर निवड झाली. १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था व पुरवठा खात्याचे मंत्री बनले. द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्र हाती घेतले. संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. १ मे १९६० रोजी त्यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील अनेक उपक्रमांना चालना दिली. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे भाग्यविधाते  म्हणतात. १९६२ मध्ये चीन युद्धाच्या वेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी यशवंतराव चव्हाणांची नेमणूक देशाच्या संरक्षणमंत्री पदावर केली. परकीय अक्रमणाच्यावेळी देश संकटात असताना हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला.  चिनी आक्रमणानंतर संरक्षण दलात चैतन्य आणण्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीरीत्या पेलली. १९६७ सालच्या निवडणुकीत अनेक राज्यात काँग्रेसचा पराभव झाला. त्याकाळात देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती त्या परिस्थितीत त्यांनी गृहखाते यशस्वीरीत्या सांभाळले. अर्थमंत्री म्हणूनही त्यांची कारकीर्द गाजली. बांगलादेशचे युद्ध, दुष्काळ यामुळे खालावलेल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला त्यांनी चालना दिली.  संस्थानिकांचे तनखे रद्द



करणे, बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे यासारखे महत्वाचे निर्णय ते अर्थमंत्री असतानाच घेतले गेले. चलनवाढिला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे धोरण देखील त्यांच्याच काळात आखण्यात आले. देशाचे परराष्ट्र मंत्री म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले.  पुढील काळात देशाचे उपपंतप्रधानपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीरीत्या सांभाळली. देशात जनता पक्षाचे सरकार असताना ते विरोधी पक्षनेते होते. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. महाराष्ट्राचे भाग्यविधाते, कार्यक्षम मंत्री, उत्तम संसदपटू, उदारमतवादी नेते अशी जनमानसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली. महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात त्यांनी मानाचा तुरा रोवला. महाराष्ट्राच्या या सुपुत्राने देशातच नव्हे तर जगात महाराष्ट्राचे  नाव उज्ज्वल केले. यशवंतराव जितके महान नेते होते तितकेच ते अभिजात साहित्यिकही होते. ललित, आत्मचरित्र, चरित्रात्मक लेखन, व्यक्तिचित्रणपर आठवणी, प्रवासवर्णन, स्फुटलेखन, वैचारिक लेख, समीक्षणात्मक लेख, पत्रलेखन, भाषणे इत्यादी स्वरूपात त्यांनी लेखन केले आहे. त्यांच्या कृष्णाकाठ, ऋणानुबंध, युगांतर, भूमिका, शिवनेरीच्या नौबती, विदेश दर्शन, सह्याद्रीचे वारे या ग्रंथातून त्यांच्या लेखन प्रतिभेचा परिचय होतो. ते जरी राजकारणी असले तरी त्यांच्यामधील चिंतनशील रसिक, सामाजिक विचारवंत ह मात्र साहित्याबरोबरच राहिला होता. त्यांच्या सर्व कलाकृती लक्षवेधक आहेत. यशवंतराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने लोकनेते होते. भारतीय राजकारणातील त्यांचे योगदान अद्वितीय असेच आहे. महाराष्ट्रासाठी तर त्यांचे योगदान अनमोल असेच आहे. महाराष्ट्र त्यांचे योगदान कधीही विसरू शकत नाही. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या पुण्यतिथीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. यशवंतराव चव्हाण यांना भावपूर्ण आदरांजली.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अशोक चव्हाणांमुळे सामान्य कार्यकर्त्यांना प्रियंका गांधी यांचा सत्कार करता आला

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्यामुळे सामान्य कार्यकर्त्यांना काँग्रेसच्या राष्ट्रीय महासचिव केंद्रीय नेतृत्व असलेल्या प्रियंका गांधी यांचा सत्कार करण्यात आला असल्याची माहिती काँग्रेसचे लोहा तालुकाध्यक्ष शरद पाटील पवार यांनी दिली.

पुढे बोलताना काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शरद पाटील पवार म्हणाले की, आपण पाहतो काही नेते सामान्य कार्यकर्त्यांना कुठे ही पुढे जाण्याची संधी देत नाहीत. आपण व आपला मुलगा, मुलगी हेच सदा पुढे केंद्रीय नेतृत्वाचा सत्कार करण्यात पुढे राहतात पक्षाला प्राव्हेट लिमिटेड बनवितात.

पण लोकनेते माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण हे सामान्य कार्यकर्त्यांना न्याय देतात. सामान्य कार्यकर्त्यांना केंद्रीय नेतृत्वाचा सन्मान करण्यासाठी नेत्याच मन मोठ लागतं ते मोठे मन केवळ लोकनेते अशोकराव चव्हाण यांचेच आहे. लोहा मतदार संघात आपण पाहतो काही नेते केवळ आपल्या मुलाला व मुलींना पुढे करतात व सामान्य कार्यकर्त्यांना बाजूला ठेवतात त्यांचा युज अँड थ्रो करतात असे काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शरद पाटील पवार यांनी सांगितले.



# शुभम मर्डरप्रकरणी आरोपींना मोक्का

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** विनोद थोरात आणि हर्षल चौधरी यांनी मयत शुभम साळुंखे याला मारण्याची सुपारी देऊन संपूर्ण टोळीने कट रचून वडजाई रोड जवळ त्याचा खून केला त्या संदर्भात सर्व आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे व त्यातील सुपारी देणारा आरोपी फरार आहे. दि.08 ऑक्टोबर रोजी रात्री धुळे शहरात गांधी पुतळया जवळ (1) महेश पवार ऊर्फ लाल डोळा, रा. स्वामी नारायण कॉलनी, धुळे (2) अक्षय साळवे, रा. गायकवाड चौक, धुळे (3) गणेश माळी, रा.स्वामी नारायण कॉलनी, धुळे 4) भुषण वाडेकर, रा. शांतीनगर, धुळे 5) जगदीश चौधरी, रा.स्वामी नारायण कॉलनी, धुळे (6) शरद पुर्ण नाव माहित नाही, रा. नाशिक (महेश पवारचा मित्र) (7) गणेश पाटील (8) जिभ्या रा गायकवाड चौक, धुळे पूर्ण नाव माहित नाही व इतर 2/3 असे मोटार सायकलीने हातात धारदार कोयते, लोखंडी रॉड, फाईट हातात घेवून प्रथम शुभम व त्याचे मित्रास हाताबुक्क्यानी मारहाण करून शुभम यास बळजबरीने मो.सा.वर बसवून कोयत्याचा धाक दाखवून वरखेडी रोड, म.न.पा. डम्पींग ग्राऊन्ड येथे नेवून त्यास एकत्रीत त्यांचे हातातील धारदार कोयते व फाईट व लोखंडी रॉडने बेदम मारहाण केली. तसेच दोन्ही पायावर काठी व दगडाने मारहाण व ठेचून हाड मोडून गंभीर दुखापत करुन त्यास जिवे मारले आहे. तसेच आरोपी (9) विनोद रमेश थोरात, रा. मनमाड जीन, धुळे व त्याचा सहकारी (10) हर्षल रघुनाथ चौधरी अशांनी गुन्हयातील आरोपीतांना पुर्व वैमनस्यातुन यातील मयतास ठार मारण्यासाठी सुपारी देवुन चिथावणी दिल्यामुळेच सदरचा गुन्हा घडला असुन, दि.09/10/2023 रोजी 18/18 वा. रोजी आझादनगर पोलीस स्टेशन जि.धुळे येथे गु.र.नं. 275/2023 भादंवि क.302, 364, 143, 147, 149, 323, 504, 506, 120(ब) सह आर्म ॲक्ट 4/25 सह म.पो.का.क.37 (1) (3)/135 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन, तपासातअंती सदर गुन्हयास भादंवि क.109, 201 व 75 हे वाढीव कलम लावण्यात आले आहेत. सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक, श्री. दत्तात्रय शिंदे, स्थानिक गुन्हे शाखा, धुळे हे करीत आहेत.

नमूद आरोपींनी मागील 10 वर्षाचे कालावधीत संघटीत गुन्हेगारी करून 03 वर्षापेक्षा जास्त शिक्षेस पात्र असलेले गुन्हे केलेले असुन, मा.न्यायालयाने दखल घेतलेली आहे. प्रचलित कायद्यानुसार प्रतिबंधित केलेले बेकायदेशीर कृत्य आरोपींचे टोळीने स्वतःचे व टोळी सदस्याचे आर्थिक फायद्यासाठी दखलपात्र व गंभीर स्वरुपाचे गुन्हे केलेले आहेत. समाजविघातक संघटना किंवा टोळी यांच्या गुन्हेगारी कृत्यास प्रतिबंध करण्यासाठी, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि तत्संबंधातील बाबींसाठी विशेष तरतुदी करण्याकरिता महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन 1999 अन्वये कार्यवाही करणे बाबत मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक आणि मा. पोलीस अधीक्षक, धुळे यांनी आदेशित केले आहे. पोलीस निरीक्षक, श्री. दत्तात्रय शिंदे, स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांनी नमुद गुन्हयाचा तपास करुन, अभिलेख व माहिती प्राप्त करुन, सदर गुन्हयास मोक्का कायद्यान्वये कारवाई करण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक धुळे यांचे मार्फत मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांची पूर्व परवानगी घेण्यासाठी प्रस्ताव सादर केला होता.




# वाळूची अवैध वाहतूक; दोन हायवा जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** तालुक्यातील पेनूर, चित्रावाडी, भारसावडा, बेटसागवी, येळी कौडगाव, हातनी, वाका, कामळज, चिंचोली आदी गोदावरी नदीच्या पात्रातुन विनापरवाना रेतीची तराफाच्या साह्याने रात्रणदिवस उपसा करून दररोज शंभर हायवा ने वाळूची वाहतूक केली जात होती. या अवैद्य रेती उपसा व वाहतुकीवर उपविभागीय अधिकारी शरद मंडलिक व तत्कालीन तहसीलदार व्यंकटेश मुंढे यांनी अनेकवेळा कार्यवाही केली. परंतु वाळू माफियांनी या कार्यवाहिला बगल देत पुन्हा वाळू उपसा व वाहतूक सुरूच ठेवली होती या अवैद्य उतखनना वर आळा घालण्यासाठी नव्याने तहसीलदार म्हणून रुजू झालेले शंकर लाड यांनी कार्यवाहीचा बडगा उगारला असून त्यांनी बेटसागवी येथून अवैद्यरित्या वाळू घेऊन जाणारे दोन टिपर जप्त केले आहेत. जप्त केलेली हायवा लोहा ठाण्यात लावण्यात आले आहे नूतन तहसीलदार लाड यांच्या पथकांनी केलेल्या कार्यवाही मुळे वाळू माफियाचे धाबे दणाणले आहेत. या कारवाई दरम्यान तहसिलदार शंकर लाड, मंडळ अधिकारी कटारे डी.एल., तलाठी मारोती कदम, परशुराम जाधव, कैलास बोधगिरे, राजू इंगळे, मनोज जाधव, संतोष अस्कुलकर यांचा समावेश होता.




# दिव्यांगासह पत्नीस मारहाण; गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** तालुक्यातील वाकी येथे दिव्यांग प्रहार सेवकास मारहाण केल्याप्रकरणी गावातीलच एका युवकाविरुद्ध घोटी पोलीस ठाण्यात दिव्यांग व्यक्तीचे अधिकार कायद्यानुसार कलम ९२ नुसार इगतपुरी तालुक्यात पहिलाच गुन्हा दाखल करण्यात आला. मारहाण होत असताना सोडवणूक करण्यास गेलेल्या त्याच्या पत्नीसही मारहाण केल्याने घोटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रहार सेवक सपनसिंह चौहान हे काल गुरुवार २३ रोजी वाकी येथे घरी आले असता मारुती मंदिरासमोर ग्रामरोजगार मजुरांची हजेरी चालू होती. यावेळी गावातीलच अमोल तुकाराम तऱ्हे, वय २२ हा येथे आला व तूम्ही येथे का राहता, तुमचा काय उपयोग असे मजुरांना म्हणत असताना प्रहार सेवक सपन चौहाण यांनी तेथे येऊन याबाबतचा जाब विचारल्याने याचा राग येऊन सपन चौहान यास शिवीगाळ व हाताने मारहाण केली. परदेशी यांची पत्नीही हा वाद सोडण्यास गेल्या असता त्यांनाही मारहाण शिवीगाळ केली. चौहान यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अमोल तुकाराम तऱ्हे या युवकाविरुद्ध घोटी ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येऊन अमोल तऱ्हे यास अटक करण्यात आली आहे.

महाराष्ट्र Business Katta














विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

# संविधानाचा स्वीकार झाला पुढे काय..?

आधुनिक केसरी

**हजारो वर्षांपासून चालत आलेल्या विषमता, अन्याय, मानवी गुलामी व एकाच वर्षाच्या अधिपत्याखाली असलेली व्यवस्था उलथून टाकुन समता, न्याय, मानवी स्वातंत्र्य मिळवून देशाच्या प्रत्येक नागरिकास समान दर्जा, समान संधी निर्माण करून देऊन प्रत्येकाला देशाच्या राज्यकारभारात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभागी होण्याचा अधिकार बहाल करून माणवाच्या जिवनाचे कल्याण करणारे जगातील एकमेव आदर्श संविधान जगातील सर्वात विद्वान महापुरुष बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अथक परिश्रमाने, तब्येची काळजी न करता, देशातील कोणत्याही नागरिकांवर संविधानीक पद्धतीने अन्याय होणार नाही.**

एखादा ही घटक चुकुनही विकासासाठी दूर राहणार नाही याची काळजी घेऊन दोन वर्षे, अकरा महिने, अठरा दिवस संविधान लिहुन संविधान समीती समोर ते मांडून बऱ्याच लोकांनी विरोध करून बरेच मुद्दे जनकल्याणाचे आहेत हे आपल्या बुद्धीमत्तेच्या जोरावर संविधान समितीला पटवून देऊन ते मान्य करून घेतले व आदर्श असे संविधान ज्या मध्ये देशाचा व देशातील जनतेचा सर्वांगीण काया पालट होईल अशी व्यवस्था निर्माण करणारे संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान समीतीकडे सुपुर्द करून जनतेच्या वतीने संविधान समितीच्या सदस्यांनी आदर्श संविधानाचा स्विकार केला आणि जनतेला समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्याच्या माध्यमातून सोन्याचे दिवस जर संविधानाची अंमलबजावणी झाली तर येतील असे वक्तव्य तत्कालीन विद्वान लोकांनी केले होते. संविधानाचा स्विकार जनतेच्या वतीने त्यावेळच्या प्रतिनिधींनी केला परंतु आजही जनता संविधानाचा नैतिक पातळीवर स्विकार करून प्रचार आणि प्रसार करताना दिसत नाही हि खरी शोकांतिका आहे. अपवाद वगळता भारतीय लोक संविधानाचे वाचन करून समजून घेत नाहीत, स्वतः ला अभ्यासु व हुशार समजणाऱ्या लोकांनी जर संविधान वाचले नसेल, ते समजून घेतले नसेल, किंवा त्याच्या डोक्यात आजही एकच विचार असेल कि संविधान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले व त्यामुळे एकाच जातीचा विकास झाला तर तो व्यक्ती देशातील सर्वात बुद्धीहीन व देशद्रोही व्यक्ती होय. कारण देशाचे संविधान समजून न घेता, त्याचा अभ्यास न करता आणि केवळ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले, आणि एकाच जातीसाठी लिहले असा पुर्वग्रह डोक्यात असलेल्या व्यक्ती राष्ट्रप्रेमी होऊच शकत नाही. संविधान न वाचणारा, संविधान घरात न आणणारा, व संविधान आणि संविधान निर्माते यांचे नाव घेताना कमीपणा वाटणारा व्यक्ती देशद्रोहीच आहे. मग तो स्वतः ला किती ही हुशार, विद्वान समजत असेल पण त्याची विद्वता शुन्य आहे. कारण ज्याला देशाचे संविधान व देशाचे उद्धारक कळत नसतील तर त्या व्यक्तीला बुद्धीचा पत्ताच नाही असे माझे वैयक्तिक मत आहे. संविधानाची उद्देशिका बघितली संविधानाची महती लक्षात येते परंतु ज्यांना वाचले कळत नाही त्यांना विद्वान म्हणणे म्हणजे स्वतः ही वैचारिक मागास असल्याचे सिद्ध होते. कारण उद्देशिके मध्येच स्पष्ट नमुद केले आहे. सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही घडवण्याचा व नागरिकांना सामाजिक, आर्थिक, राजनैतिक- न्याय, विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा व उपासना चे- स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची - समानता निश्चित पणे प्राप्त करून देण्याचा, आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता यांचे आश्वासन देणारी- बंधुता, प्रवर्धित करण्याचा संकल्प पुर्वक निर्धार करून आमच्या संविधान सभेत तारखेसह अंगिकृत करण्याचे वचन देशातील जनतेला दिलेले आहे. याचाच अर्थ संविधाना पुर्वी देशात न्याय, स्वातंत्र्य, समानता व बंधुता नव्हती हे उघड होते. आणि संविधानाने आपल्याला एकसंघ करून सर्व काही मिळवून दिले.





प्रत्येक नागरिकांना आवश्यक असलेले मुलभूत अधिकार बहाल करून त्यांच्या जिवनात वैचारिक व सामाजिक उर्जा भरण्याचे काम केले गेले. समानतेचा, स्वातंत्र्याचा, शोषणाविरूद्धचा, धर्मस्वातंत्र् याचा व सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क देऊन त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी संविधानाने करून ठेवली आहे. ह्या मुळे जनतेला जगायला बळ मिळालेच परंतु जनतेचा खरा विकास हा संविधानाचा भाग चार यामुळे झाला आहे. भाग चार मध्ये मार्गदर्शक तत्वांचा समावेश करून नागरिकांना सोन्याचे दिवस येतील अशी व्यवस्था केली आहे.
सत्तेत असलेल्या लोकांना वेगळे असे काहीच करण्याची गरज नाही, किंवा सत्तेत बसलेल्या लोकांनी जनतेसाठी काही एखादी योजना सुरू करून विकासाच्या प्रवाहात आणण्याचे प्रयत्न केले तर ते सरकारचे उपकार नसुन सरकारची जबाबदारी आहे. आणि ते संविधानाचे उपकार आहेत हे विसरून चालणार नाही.
शिक्षण देताना कोणताही भेदभाव न करता स्त्रि पुरूषांना शिक्षण घेण्याचा हा त्यांचा मुलभूत अधिकार आहे तो कोणीच बदलु शकत नाही. परंतु शिक्षणा नंतर किंवा काही घटक शिकलेला नाही तरीही त्या घटकासाठी सरकारने अर्धात संविधानीक शब्द म्हणजे राज्याने कलम ३९ (क) नुसार स्त्रि पुरुषांना रोजगाराची समान संधी उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. परंतु लोकांनी संविधान वाचले नाही म्हणून लोकांना संविधान कळाले नाही आणि राज्याकडे नैतिकता, प्रामाणिक पणा व जनकल्याणाचा विचार नसल्याने राज्य जनतेची लुट करत करते. जसे रोजगार हमी योजना हे कलम ३९ क चा परिणाम आहे. परंतु रोजगार हमी अर्ध्यात तुम्ही अर्ध्यात आम्ही आणि काही वर्षापासून बऱ्याच भागातून ही योजना ही गायब झाली. परंतु लोकांना रोजगाराचे संसाधन व समान संधी उपलब्ध करून देण्याची नैतिक जबाबदारी राज्याची आहे. एखाद्या राज्याने एखाद्या कामाच्या ठिकाणी संधी निर्माण करून दिली असेल तर कलम ३९ (घ) नुसार राज्य पातळीवर समान कामाला समान वेतन देण्याची तरतुद ही केली आहे. मग ते काम शासकीय, निमशासकीय कोणत्याही पातळीवर असो. म्हणून शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांना समान कामासाठी समान वेतन व भत्ते दिले जातात त्या ठिकाणी कोणताही भेदभाव केला जात नाही.
हे उपकार संविधानाचेच आहेत. कलम ३९ इ नुसार स्त्रि पुरुष यांच्या आरोग्य व ताकद याचा दुरूपयोग करता येणार नाही आणि बालकांच्या कोवळ्या वयाचा दुरूपयोग करता येणार नाही, म्हणजेच कोणत्याही कामाच्या ठिकाणी कोणत्याही स्त्रि पुरुष यांना अवघड, जड व जिवापेक्षा वरचड काम सांगता येणार नाही, आर्थिक परिस्थिती आणि कामाची गरज याचा गैरफायदा कोणालाही घेता येणार नाही म्हणून कामगारांना संरक्षण दिले. संविधानाचे कलम क्रमांक ४१ चा विचार केला तर आपल्या लक्षात येईल की संविधानाने लहानातील लहान घटक सुद्धा दुर्लक्षित होऊ दिला नाही. कारण कलम ४१ नुसार कामाचा, शिक्षणाचा हक्क राखुन तर ठेवलाच आहे परंतु वृद्ध लोक, विकलांग, आणि अपराध नसताना एखाद्या व्यक्तीच्या वाट्याला हलाखिचे जिवन आले असेल तर त्यांना अर्थ साह्य करण्याची तरतूद संविधानामध्ये केलीली आहे. जनप्रतिनिधी अर्थात जनसेवकांना केवळ त्याची अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. याच कलमाचा आधार घेऊन शैक्षणिक कार्यास हातभार लागावा म्हणून सारथी, महाज्योती सारख्या संस्था निर्माण करून ओबिसी व मराठा तरुणांना शिक्षणासाठी आर्थिक साह्य केले जाते हि संविधानाची देण आहे. वृद्ध व निराधार लोकांना दरमहा मासिक अर्थ साह्य, विकलांग व्यक्तीला व्यवसायासाठी आर्थिक साह्य, व त्यांना काही उपकरणे, मासिक आर्थिक साह्य जे काही मिळते ते कलम ४१ नुसार मिळते. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, वृद्ध व विकलांग लोकांना उदरनिर्वाहा साठी सरकार ला नवीन काहीच करायची गरज नाही फक्त संविधानात आहे तेच त्या गरजू लोकांना देण्याचे काम प्रामाणिकपणे करणे आवश्यक आहे. कलम ४३ नुसार राज्याने नागरिकांना पेन्शन ची व्यवस्था करून देण्यात यावी व काम करताना कामगारांना, कर्मचाऱ्यांना त्यांना त्यांचे जिवन जगताना सामाजिक व सांस्कृतिक जिवन जगता यावे अशा पद्धतीने कामाची व्यवस्था करावी अशी तरतुद करून दिली आहे. याचा अर्थ कामगारांना व कर्मचाऱ्यांना निर्वाह वेतन तर मिळायच पाहिजे परंतु दैनंदिन जिवन जगताना त्याचे जे सामाजिक व सांस्कृतिक जिवन आहे तेही जगता आले पाहिजे हे संविधानानेच करून दिले आहे. म्हणून काम करताना काही पगारी सुट्या ह्या शासकीय पातळीवर व काही पगारी सुट्या ह्या वैयक्तिक पातळीवर मिळतात हि संविधानाची देण आहे. दिवाळी, दसरा, इद, ख्रिसमस ला कर्मचाऱ्यांना सुट्टी देऊन त्यांना त्यांच्या संस्कृती ची जोपासना करण्याचा अधिकार संविधानाचे दिलेला आहे.
एखाद्या वेळी एखाद्या कर्मचाऱ्यांना बायको सोबत फिरायला जाने, मित्र मैत्रिणीच्या लग्नाला जाणे, नातेवाईकांच्या सुख दःखाच्या कार्यक्रमात जाने यासाठी कर्मचारी पगारी सुट्टी घेऊन जातात.
हे उपकार केवळ आणि केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधानाचे आहेत. एवढे आदर्श संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्विकृत करून लोकांना सोन्याचे दिवस दिले. परंतु संविधानाचा स्विकार, संविधानाचे फायदे घेणारे लोक संविधाना प्रती संवेदनशील नसतील आणि संविधान न वाचता समजून घेत नसतील आणि संविधानाला एकाच जातीची संपती समजून आपल्या विद्वतेचे प्रदर्शन करत असतील तर यांना संविधान साक्षर करणे आवश्यक आहे. संविधानाचा स्विकारा सोबतच संविधानाचा प्रचार प्रसार करणे खुप आवश्यक आहे. म्हणून सर्वांनी एकजूट होऊन संविधानाची योग्य मांडणी करून संविधान राष्ट्रीय ग्रंथा सोबतच प्रत्येक नागरिकांच्या उद्धाराचे माध्यम आहे. याबद्दल जागृती करून संविधान मना मनात पोहचवण्यासाठी प्रयत्न केला तरच आपण खरे भारतीय आहोत. अशी ओळख निर्माण होईल.

# प्रगल्भ चिंतनाचा ठेवा : 'आजची मराठी बालकविता'

आधुनिक केसरी

**अतिशय जिव्हाळ्याच्या आणि आवडीच्या बालसाहित्य सागरात मनसोक्त अवगाहन करून तळातील रत्नराशी रसिकांना देण्याचा डॉ. सुरेश सावंतसरांचा प्रांजळपणा, निर्मळपणा सर्वपरिचित आहे. सातत्याने गुणवत्तापूर्ण लेखन करून त्यांनी बालसाहित्यात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. अर्धशतकी साहित्यकृती निर्माण करून सरांचा हा प्रवास शतकोत्सवाकडे घोडदौड करतो आहे. नुकताच त्यांचा 'आजची मराठी बालकविता' हा समीक्षाग्रंथ पुण्याच्या संस्कृती प्रकाशनाने सिद्ध केला आहे. सदर ग्रंथात २४ लेख आहेत. बालसाहित्याचा सखोल अभ्यास, मनन व चिंतनातून या ग्रंथाची अद्वितीय अशी निर्मिती झाली आहे. प्रत्येक लेखात त्या कवितासंग्रहातील कवितेचे सौंदर्य उलगडून दाखवले आहे. त्यामुळे वाचकाला कवितेचे आकलन अतिशय सुलभपणे होते. डॉ. सावंत यांची अध्ययनशीलता आणि गुणग्राहकता लक्षवेधी आहे.**

लेखकाने बालकांच्या मनोविश्वाशी तादात्म्य पावण्याचे कौशल्य संपादन केले आहे. एकरुपता साधल्याशिवाय साधना फळाला येत नाही आणि साधनेचे फळ किती प्रबळ असते हे या लिखाणावरून आपल्या लक्षात येते. डॉ. सावंत यांना बालकांसाठी सोपे लिहिण्याची अवघड कला सहजसाध्य झालेली आहे.
पहिलाच लेख ज्येष्ठ बालसाहित्यिक प्रा. केशव बा. वसेकर यांच्या समग्र बालकवितेवर लिहिलेला आहे. वसेकरांनी अतिशय निष्ठेने बालकुमारांसाठी नऊ कवितासंग्रह लिहिले आहेत. त्यावर लेखकाने चिकित्सक आणि सर्वस्पर्शी लेख लिहिलेला आहे. कालानुक्रमे कवीच्या कवितेचा कसा विकास होत गेला, याचा परामर्श घेतला आहे. कवीच्या बालपणातील खेळ, त्या काळातील ग्रामीण जीवन आणि तेथील भवताल याचा सांगोपांग धांडोळा या लेखात घेतलेला आहे. ग्रामीण बोलीभाषेत लिहिलेली वसेकरांची कविता ही वास्तवदर्शी असून ती अद्‌भुतरम्यता आणि कल्पनारम्यता यामध्ये अडकून पडलेली नाही, हे या ठिकाणी डॉ. सावंत सर आवर्जून नमूद करतात.
खानदेशकन्या माया धुप्पड यांच्या समग्र कवितेवर लेखकाने १८ पृष्ठांचा लेख लिहिला आहे. माया धुप्पड यांच्या ८ बालकवितासंग्रहांचा यामध्ये लेखकाने धांडोळा घेतला आहे. त्यांच्या 'गाऊ अक्षरांची गाणी' या पुस्तकांमधल्या चार चार ओळींच्या छोट्या छोट्या ५७ कविता या बालकांच्या मनाचा वेध घेतात. या कवितांचा बालवाडीसाठी शिशुगीत म्हणून छान उपयोग झाला आहे. त्यांच्या 'पावसाची राणी, गाऊ अक्षरांची गाणी, वाऱ्याची खोडी, सावल्यांचं गाव, नाच रे बाळा, हत्तीचा व्यायाम, आभाळाची छत्री, चिमणी उडाली भुर्र या संग्रहांमधून कवयित्री मनोरंजनाबरोबरच मुलांना संस्काराच्या गोष्टी शिकवायला विसरत नाहीत. कष्टाचे महत्त्व विशद करतात. कल्पनारम्यतेचे महत्त्वही सांगतात. ससा कासवाची गोष्टदेखील कवितारुपात मांडतात. बाळगोपाळांसाठी त्यांच्या नावातील माया कवितेत उतरली असल्याचे लेखकाने नमूद केले आहे. सदानंद पुंडपाळ यांच्या 'हिरव्या रानाचे गोड गाणे' यावर छान लेख लिहिला आहे. मानवाने केलेल्या पर्यावरणाच्या विध्वंसाची कवीला चिंता आहे. नद्यांचा छळ कवीला अस्वस्थ करतो. पर्यावरणाच्या चिंतेचे चिंतन कवी करतो. चक्रधर स्वामींनी दिलेल्या चिऊकाऊच्या दृष्टांताप्रमाणे कवीने पर्यावरण जागृतीसाठी चिऊकाऊच्या गोष्टींचा उपयोग केला आहे. मोकळ्या रानातून फिरवून आणणारी ही कविता मानवाला दानव न होण्याचा सल्ला देते. पुंडपाळांच्या 'हिरवी राने,गाते गाणे' या कवितासंग्रहासाठीचा हा प्रस्तावनापर लेख छान जमून आला आहे. डॉ. भगवान अंजनीकरांच्या 'किती सुंदर जग' या बालकवितासंग्रहाच्या निमित्ताने लेखकाने त्यांच्या लेखनाच्या संख्यात्मकतेचा आणि गुणात्मकतेचा गौरव केला आहे. 'किती सुंदर जग' ह्या बालकवितासंग्रहातील कविता एकतेची समंजस जाणीव करून देतात. अतिशय सुलभ बोध आणि जाणिवा मुलांमध्ये जागृत करण्याचं काम या कविता निश्चितपणानं करतात, हेसुद्धा या ठिकाणी आवर्जून उल्लेखिलेले आहे. ग्रामीण आणि शहरी या संस्कृतीतले अंतर वाढल्यामुळे आजोळचे सुख, तिथले खेळ, खेड्यातलं मनमुक्त आणि मनसोक्त हुंदडणं या सर्वच गोष्टींपासून शहरवासी झालेली मुलं दुरावलेली आहेत. डॉ. भगवान अंजनीकरांची एकूण बालकविता ही केवळ रंजनप्रधान नसून कुमारांना गतिशील बनवणारी आणि सुंदर जगाचे स्वप्न रंगवणारी कुमारकविता आहे. त्यावरचा हा सुंदर लेख. 'अनमोल वेळ' या निर्मला मठपती यांच्या कवितासंग्रहाबद्दल लिहीत असताना लेखकाने निर्मला मठपती यांच्या बालसहित्यातल्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे. 'अनमोल वेळ' या संग्रहात २३ कविता विषयांची विविधता घेऊन येतात. यातील प्रार्थना, खरी परी, दिवाळीची सुट्टीची, मजा आलीच नाही अशा विविध विषयांवरच्या कवितांचा या लेखात सुंदर असा धांडोळा घेण्यात आलेला आहे. कवयित्री बालकांच्या भावविश्वाशी किती समरस झालेल्या आहेत, याचा आरसा म्हणजे हा कवितासंग्रह आहे. अतिशय सुंदर, रसरशीत कविता समरसतेशिवाय येत नाही, असादेखील उल्लेख लेखकाने केला आहे. बालसाहित्यात महत्त्वपूर्ण योगदान असलेल्या प्रा. लीला शिंदे यांच्या 'मुंगी निघाली एव्हरेस्टवर' या कवितासंग्रहाविषयीचा लेख वाचनीय आहे. या कविता प्राण्यांच्या अद्‌भुत जगाची सफर घडवून आणतात, असे लेखकाने म्हटले आहे.




मुंबईचे प्रसिद्ध बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांच्या खरंच सांगतो दोस्तांनो, आनंदझुला, शब्दांची नवलाई आणि छंद देई आनंद या चार कवितासंग्रहांवरचे अतिशय अभ्यासपूर्ण असे चार लेख या पुस्तकात आहेत. बालसाहित्यातले झपाटलेले आणि समर्पित साहित्यिक असा आव्हाड यांचा गौरवपूर्ण उल्लेख या लेखांमध्ये लेखकाने केलेला आहे. या संग्रहातल्या कविता या रंजनातून शिकवण, बोध, संस्कार यांचे धडे देणाऱ्या आहेत. या चारही कवितासंग्रहातील कविता आणि कवीचे मुलांबद्दलचे प्रेम कवितांतील शब्दाशब्दांत आपल्याला दिसून येते, असे डॉ. सावंत या ठिकाणी नमूद करतात. यातील एक लेख 'शब्दांची नवलाई'ला लिहिलेली प्रस्तावना आहे. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त बालसाहित्यिक आबा गोविंदा महाजन यांच्या 'जॅक्कुला' या कवितासंग्रहावरचा लेख या पुस्तकात आहे. कवीने कल्पनेतून निर्माण केलेली अंधेरनगरी, या नगरीचे नाव जॅक्कुला आहे. ज्या ठिकाणी मगरींचा रहिवास आहे, अशी अद्‌भुत पात्रे यामुळे या रहस्यमय जॅक्कुला नगरीत कशा गमतीजमती घडतात, त्या बाळगोपाळांना पाहायला मिळतात.
उत्तम सदाकाळ यांचं बालसहित्यातलं योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांचा जंगलगाणी हा नवाकोरा बालकविता संग्रह म्हणजे मुलांसाठी आनंदाची पर्वणी आहे. अतिशय चैतन्यदायी रचनांचा हा कवितासंग्रह बालकांना निश्चित आवडेल, असा विश्वास या लेखाच्या माध्यमातून लेखक देतात. प्रस्तुत लेख हा उत्तम सदाकाळ यांच्या 'जंगल गाणी' ह्या बालकवितासंग्रहाला पाठराखण म्हणून लिहिलेल्या मजकुराचा विस्तार आहे.
पंडित पाटील यांची 'गोड गाणी' हा पंडित पाटील यांच्या कवितासंग्रहावरचा लेखही सुरेख जमला आहे. पंडित पाटील या मातृहृदयी शिक्षकाने लिहिलेल्या या कविता खरोखरच बाळमुखातली गोड गाणी आहेत, असा उल्लेख डॉ. सावंत येथे करतात. विविध कवितांमधून बालगोपाळांचा आनंद, बालविश्वामध्ये रमण्याचं कसब या कवितासंग्रहामधून पंडित पाटलांनी साधलेले आहे, असा महत्त्वपूर्ण उल्लेख गोड गाण्याच्या निमित्ताने लेखक या ठिकाणी करतात.
उस्मानाबादचे कवी समाधान शिकेतोड यांचा 'पोपटाची पार्टी' तसेच प्र. श्री. जाधव यांचा 'गुणगुण गाणी' ह्या कवितासंग्रहांवरचे लेखदेखील अतिशय उल्लेखनीय आहेत. अंबडचे कवी नारायण खरात यांच्या 'चंद्रावरची सहल' या बालकवितासंग्रहावर 'नारायण खरात यांनी घडविली चंद्रावरची सहल' हा लेख अतिशय सुंदर झाला आहे. या कवितांमधून निसर्गाचे रक्षणाविषयी कळकळीने उल्लेख येतात. कवीचे शाळेवरचे प्रेम कवितेमध्ये दिसून येते, हे नमूद करतात. अद्‌भुतरम्यता, निरागस स्वप्नरंजन, निसर्गाविषयी प्रेम, तळमळ, सजीव सृष्टीविषयीचे कुतूहल या कवितेतून आलेले आहे, असा महत्त्वपूर्ण उल्लेख डॉ. सावंत करतात.

**क्रमशः**

नारायण खरात, अंबड, जि. जालना.

# ये रास्ते हैं प्यार के चलना संभल संभल के...

आधुनिक केसरी

**सोलापूर जिल्ह्यातील एका गावात शशिकला जावळकर यांचा ४ ऑगस्ट, १९३२ या दिवशी जन्म झाला. त्यांचे वडील मोठे उद्योजक होते. त्यांच्याकडे पैसा अडका तर बराच होता शिवाय मोठी मालमत्ताही होती. धनधान्यसंपन्नतेमुळे शशिकला यांचे बालपण आरामात व्यतीत झाले. शशिकला यांचे लहानपणापासूनच बुद्धिकौशल्य उत्तम होते. नाटकात काम करण्याव्यतिरिक्त त्या नृत्य करीत आणि गातही असत. कुटुंबासमवेत त्यांचे जीवन सुखाने सुरू असतानाच अचानकपणे दिवस फिरले आणि होत्याचे नव्हते झाले. अगदी डोळ्यांची पापणी लवते न लवते तोच सारे काही संपले. उदभवलेल्या प्रतिकूल परिस्थितीमुळे निरुपायाने त्यांनी मुंबईची वाट धरली. शशिकला यांना चित्रपटात काही तरी काम मिळेल असे वाटत होते.**

पण म्हणतात ना की मनात असून काही होत नाही; जे नशिबात असेल तेच होते. मुंबईत आल्यावर चित्रपटात काम मिळणे तर दूरच राहिले; खाण्या-पिण्याचेही हाल होऊ लागले. कोठे राहायचे हा यक्षप्रश उभा होता. परिस्थिती तर इतकी वाईट बनली होती की शशिकला यांच्यावर लोकांच्या घरांमधे कामे करण्याची वेळ आली. त्यांनी लोकांकडे भांडी घासणे, कपडे धुणे, झाडलोट करणे असली कामे केली. असल्या परिस्थितीतही शशिकला यांनी धीर सोडला नाही आणि हिंमतीने चित्रपटात काम मिळविण्याचा प्रयत्न चालूच ठेवला. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले आणि त्यांची प्रख्यात गायिका-अभिनेत्री नूरजहां यांच्याशी भेट झाली. नूरजहां यांच्या सांगण्यावरून त्यांचे पती शौकत हुसेन रिझवी यांनी आपल्या `झीनत' (१९४५) या चित्रपटातील एका कव्वालीत काम करण्याची शशिकला यांना संधी दिली. `झीनत' प्रदर्शित झाला आणि शशिकला यांच्या नशिबाने त्यांना हात देण्यास प्रारंभ केला. चित्रपटसृष्टीत हळू हळू त्यांना ओळख मिळू लागली तसेच कामही मिळू लागले. आता त्यांच्यापुढे एकमेव ध्येय होते की अधिकाधिक काम करून बराच पैसा कमवायचा आणि आपल्या कुटुंबीयांना सुखात आणि आनंदी ठेवायचे ! अनेक चित्रपटांत नायिकेची भूमिका करणाऱ्या शशिकला आता पडद्यावर नायिकेऐवजी खलनायिका बनू लागल्या. शशिकला यांना चित्रपटांमधे उत्तम यश मिळू लागले. मुंबईत गाजलेल्या `आहुजा खून खटल्या'वर १९६३ साली अभिनेते सुनील दत्त यांनी निर्माण केलेल्या आणि आर. के. नय्यर (अभिनेत्री साधना यांचे पती) यांनी दिग्दर्शित केलेल्या `यह रास्ते हैं प्यार के' या चित्रपटात शशिकला यांची महत्त्वाची भूमिका होती. या चित्रपटातील "ये रास्ते हैं प्यार के चलना संभल संभल के, यहां लूटते हैं दिल को अरमान मचल मचल के....." हे आशा भोसले यांनी गायिलेले गीत शशिकला यांच्यावर मुंबईच्या `सन एन सॅन्ड' या पंचतारांकित हॉटेलच्या आवारात चित्रित झाले होते. शशिकला यांनी हे गीत पडद्यावर उत्तम रीतीने सादर केले; पण वास्तविक जीवनात मात्र स्वतःसाठी त्यातून काहीच बोध घेतला नाही. गायक-अभिनेते कुंदन लाल सहगल यांचे नातेवाईक असलेले ओमप्रकाश सहगल



यांच्या शशिकला प्रेमात पडल्या आणि त्यांच्याशी त्यांचा प्रेमविवाह झाला. शशिकला यांना दोन कन्या झाल्या ; पण तोवर ओमप्रकाश आणि त्यांच्यांत मतभेद सुरू झाले. पुढे पुढे तर मतभेद विकोपाला जाऊन दोघांत कडाक्याची भांडणे होऊ लागली. परिणामी शशिकला यांनी आपल्या दोन कन्यांसह संपूर्ण कुटुंबाला सोडले. सगळे सोडून देऊन त्या अन्य एका व्यक्तीबरोबर परदेशात निघून गेल्या. बहुदा यालाच `विनाश काले विपरीत बुद्धी' असे म्हणत असावेत. माणसाचे जेव्हा दिवस फिरतात तेव्हा त्याची मती कुंठित होते. शशिकला यांच्या बाबतीतही असेच काहीसे घडले. ज्या व्यक्तीसमवेत त्या परदेशात गेल्या त्या व्यक्तीने त्यांची घोर फसवणूक केली. त्या माणसाने त्यांचा इतका शारीरिक आणि मानसिक छळ केला की त्या त्याची साथ सोडून आपला जीव वाचवत कशाबशा भारतात परतल्या. भारतात परतल्यावरही त्यांच्या मनाला शांती लाभली नाही म्हणून मनःशांती मिळविण्यासाठी त्या थेट कोलकत्याला मदर तेरेसा यांच्याकडे गेल्या. तेरेसा यांच्या सहवासात त्या तब्बल ९ वर्षे राहिल्या आणि त्यांनी दीन-दुबळ्यांची सेवा केली. दीनांची सेवा केल्यामुळे त्यांच्या मनाला अभूतपूर्व शांती मिळाली आणि त्या पुन्हा मुंबईला परतून चित्रपटाच्या कामात व्यग्र झाल्या.

शशिकला यांनी `गुमराह', `वक्त', `आई मिलन की बेला', `फूल और पत्थर', `सुजाता' या आणि अन्य अनेक चित्रपटांत भूमिका केल्या. या व्यतिरिक्त `जीना इसी का नाम है', `सोनपरी' आणि `दिल देके देखो' या दूरचित्रवाणीवरील मालिकांमधेही भूमिका केल्या. चित्रपटात नायिकेच्या भूमिकेबरोबरच अन्य प्रकारच्या भूमिकाही सहजपणे करणाऱ्या शशिकला यांना `आरती' आणि `गुमराह' या दोन गाजलेल्या चित्रपटांमधील भूमिकांसाठी `फिल्मफेअर'ची सर्वोत्कृष्ट अभिनयाची पारितोषिके मिळाली होती. २००७ साली भारत सरकारने त्यांना `पद्मश्री' किताबाने सन्मानित केले होते.
आपल्या जीवनात विविध रंग पाहिलेल्या आणि अनेक जबरी दंश सहन केलेल्या शशिकला यांचे ४ एप्रिल, २०२१ या दिवशी मुंबईत वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले. आज शशिकला आपल्यात नसल्या तरीही आपल्या अभिनयाने त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर जो ठसा उमटविला आहे तो पुसला जाणार नाही.

अनिल तोरणे
तळेगाव दाभाडे, पुणे

# इतका जळफळाट कशासाठी ?



बुद्धभूषण चं. कांबळे
संपर्क क्र. 7498715661

आधुनिक केसरी

**हल्ली जळक्या प्रवृत्तीच्या लोकांचा सुळसूळाट फार वाढला आहे. लोकांचे वा जवळच्या मित्रांचे अथवा नातेवाईकांचे भले झालेले कोणालाच बघवत नाही.मित्रांनी वा शेजाऱ्यांनी नवीन बाईक घेतली की लगेच आपणही अशीच बाईक घ्यावी ही चुरस मनामध्ये निर्माण होते. आणि या नादात त्यांचा जळफळाट व्हायला लागतो. जोपर्यंत आपण तशी गाडी घेणार नाही तोपर्यंत आपण स्वस्त बसणार नाही अशी जिद्द त्यांच्या मनामध्ये निर्माण होते व त्यांना अस्वस्थ करुन टाकते. जगाच्या पाठीवर कुठेही जावा अशा जळक्या प्रवृत्तीचे लोक आपल्याला बघायला व अनुभवायला मिळतील. परंतु त्याने बाईक घेतली म्हणून आपणही बाईकच घ्यावी ही चीड मनामध्ये न आणता आपण त्यापेक्षाही काहीतरी अलग करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.**

तेव्हाच खऱ्या अर्थाने आपण सुखी व समाधानी व्हाल.परंतु आजकाल मी पहातोय की एखाद्याने नवीन हॉटेल टाकले की लगेच त्याच्या बाजूला कोणीतरी स्पर्धक तयार होतो आणि तसेच हॉटेल टाकतो. परंतु काहीतरी आगळं वेगळं करण्याचा प्रयत्न करत नाही. एखाद्याने पानटपरी टाकली की लगेच त्याच्या बाजूला कोणीतरी दुसरा व्यक्ती तशीच टपरी टाकतो. खुशाल टाका त्याला माझा काही विरोध नाही.कारण प्रत्येकाला घटनेत स्वातंत्र्य आहे.टाकण्याचा अधिकार आहे.परंतु त्याने तो व्यवसाय उभा केला किंवा धंदा टाकला म्हणून आपणही त्याच्या बाजूला तोच व्यवसाय उभा करावा हे माझ्या मते चूकीचे आहे.काहीतरी नवीन उद्योग उभारून तो उद्योग कसा नंबर एकवर आणता येईल याचा विचार केला पाहिजे. भावकितील एखाद्या सदस्याने आकर्षक घर किंवा बंगला बांधला की आपणही एक ना एकदिवस असाच बंगला बांधणार असे ठणकावून सांगणारे व जळफळाट करून घेणारे महाभागही खूप आहेत. पण इतका जळफळाट कशासाठी करायचा? हा प्रश्न मला राहून राहून पडतो.आणखीन एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे परक्याचा मुलगा मोठ्या पोस्टवर गेला की यांना आनंद होतो आणि भावकीचा मुलगा मोठा अधिकारी झाला की यांचा



जळफळाट होतो.अशा जळक्या प्रवृत्तीचे लोक संख्येने मायंदळ झाले आहेत. लोकांची मानसिकता येवढी गलिच्छ झाली आहे की कळायला मार्गच नाही. परंतु काळ बदलला, काळाच्या ओघात माणसे बदली आणि माणसे जळक्या व कपटी प्रवृत्तीचे बनली. नाहीतर पूर्वी एवढे कपटी व जळक्या प्रवृत्तीचे लोक नव्हते. प्रत्येकात सहानुभूती ठासून भरली होती. दुसऱ्याच्या सुखात आपले सुख शोधणारी माणसे होती. भावाभावात एकमेकांबद्दल प्रेम, माया व आपूलकी होती. घरोघरी मानवता आनंदाने नांदत होती.भावाचा मुलगा अधिकारी झाला की दुसरा भाऊ मिठाई व पेढे घेऊन यायचा. येवढ्या साफ नितीमत्तेची व निर्मळ मनाची माणसे तेव्हा होती. जळक्या व कपटी प्रवृत्तीचे लोक शोधूनही सापडत नव्हते. तेव्हा जाता जाता समस्त जणतेला कळकळीची नम्र विनंती करतो की, दादांनो उगाच जळफळाट करणे सोडून द्या. दुसऱ्याबरोबर आपली तुलना करणे त्यागा. दुसऱ्याची कॉपी करणे टाळा व काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न करा म्हणजेच आपल्याला काहीतरी अजब केल्याचा एक वेगळाच आनंद निर्माण होईल...

# माणूस: उत्क्रांतीवादाचे शिखर!




श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**डार्विनच्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धान्ताला त्याच्या काळापासूनच विरोध होत आला आहे आणि या विरोधात सनातन्यांनी कायम महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अनेक ज्ञानीगुणी जण आणि पुढारी यांनी देखील अलीकडेच उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला खोटे ठरवण्याचे प्रयत्न केलेत, त्यानिमित्ताने या विरोधांचा घेतलेला मागोवा. डार्विन आणि उत्क्रांतिवाद हे जणू एक समीकरणच मानले जाते. उत्क्रांती म्हणजे निसर्गानुसार सजीवांमध्ये होणारे आणि खूपच हळूहळू अंगिकारले जाणारे बदल होय. पृथ्वीच्या उत्पत्तीपासून होत आलेले हे बदल सजीवांच्या उदयास अनुकूल होते. चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा जन्म दि.१२ फेब्रुवारी १८०९ साली इंग्लंड येथील शोर्पशायर शहरातील श्रेब्स्बुरी या गावी झाला. ते एक ब्रिटिश पदार्थशास्त्रज्ञ आणि भूवैज्ञानिक होते.**

(मागील अंकावरून)
त्यामुळे त्या दिवसापासून टेनेसी या राज्यात डार्विनप्रणीत उत्क्रांतीवाद शिकवणे, हा गुन्हा मानण्यात येऊ लागला. हा कायदा म्हणजे शिक्षण घेण्याच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला आहे, म्हणून त्याला उदारमतवादी घटकांनी विरोधही केला होता. त्यातल्याच कुणाच्या तरी सुपीक डोक्यात आपल्या गावाचे नाव अमर करायची कल्पना आली. आपण जर या कायद्यालाच आव्हान दिले तर विज्ञानाच्या इतिहासात आपल्या गावाचे नाव कायमस्वरूपी अमर होईल, ह्या कल्पनेने प्रभावीत झालेल्या डेटन गावच्या काही तरुणांनी त्यांचाच मित्र असलेल्या जॉन थॉमस स्कोप्स त्या शिक्षकाविरुद्ध पोलिस ठाण्यात तक्रार केली. स्कोप्सला वर्गात उत्क्रांतीचा धडा शिकवत असताना पोलिसांनी अटक केली. हा खटला खूपच गाजला. डेटन, टेनेसी या गावाला खरोखरच प्रसिद्धी मिळाली आणि जेव्हा जेव्हा उत्क्रांतीवादाबद्दल बोलले जाते, तेव्हा तेव्हा स्कोप्स ट्रायलचा उल्लेख अपरिहार्यच असतो. या खटल्यात भर न्यायालयात वकिलांच्या शाब्दिक चकमकी झडल्याच, पण शारीरिक मारामाऱ्याही घडल्या. आरोपी दूरच, त्याच्या आधी कोर्टाची बेअदबी केल्याबद्दल आरोपीच्या वकिलालाच दंड ठोठावला गेला. गर्दी अमाप होती. तिच्यासाठी मांडव घातले गेले. वृत्तपत्रांनी या खटल्याला "मंकी ट्रायल" म्हणायला सुरुवात केली. कोर्टाने अखेरीस स्कोप्सला शंभर डॉलर एवढा दंड केला. पुढे सर्वोच्च न्यायालयाने तो रद्द ठरवला. कायदा मात्र तसाच राहिला. या खटल्याचा एक परिणाम म्हणजे इतरही अनेक राज्यांनी असेच कायदे केले. इ.स.१९६५मध्ये सुझान एपर्सन या शिक्षिकेने अर्कान्सास राज्यातील मंकी लॉ रद्द व्हावा, यासाठी न्यायालयात धाव घेतली. अर्कान्सास राज्यात या कायद्याला रॉटनबरी एक्ट असे म्हटले जात होते. खटला दाखल करणाऱ्या एपर्सन या शिक्षिकेच्या आडनावाची फोड एप पर्सन अशी करून, ती हा कायदा रद्द करण्यासाठी धडपडणारच, असं सनातनी विचारांची मंडळी वृत्तपत्रांकडे पत्र पाठवत होती, तर सुधारणावादी "हा रॉटन एक्ट बेरी करा" अशा तऱ्हेचे उत्तर देऊन तसे मोर्चे काढू लागले. केनेडी यांच्या खुनाची चौकशी करणाऱ्या आयोगाचे अध्यक्ष अर्ल वॉरेन यांच्या न्यायालयात हा खटला



चालला. त्यांनी हा कायदा अवैध ठरवला आणि अर्कान्सास राज्यात डार्विनप्रणीत उत्क्रांतीवाद शिकवायला पुन्हा सुरुवात झाली.

सन १९८२ साली पुन्हा एकदा डार्विनवाद न्यायालयात आला. खरंतर या वर्षी डार्विनच्या मृत्यूस शंभर वर्षे होत होती. या खटल्यामध्ये सनातनी मंडळींनी स्टीफन जे.गुल्ड या शास्त्रज्ञाची साक्ष काढली होती आणि तिथंच ते फसले. स्टीफन जे.गुल्ड हे प्राणिशास्त्रज्ञ आहेत, लिम्नॉलॉजी म्हणजे शंखशिंपल्यातील प्राणी हा त्यांचा खास अभ्यासाचा विषय. हा अभ्यास करताना एक गोष्ट त्यांच्या लक्षात आली. प्राण्यांची उत्क्रांती ही साधी सरळ अशा प्रकारे झालेली नाही, तर काही वेळा अल्पावधीत परिस्थितीनुरूप प्राणी बदलतात तर काही वेळा दीर्घकाळ त्यांच्यात कोणताही बदल होत नाही. यामुळे आज जरी माणूस हा डार्विनवादानुसार उत्क्रांतीचं शिखर मानला जात असला तरी तो उद्या बदलणारच नाही, याची खात्री देता येत नाही. (लाख दोन लाख किंवा पाच लक्ष वर्षे हा भूशास्त्रीयदृष्ट्या अत्यल्प काळ आहे, हे इथं लक्षात ठेवायला हवं.) कारण माणूस पृथ्वीच्या इतिहासात नुकताच अवतरला आहे. त्यांच्या या सिद्धांताबद्दल मतभेद आहेत, ते असणारच आणि असायलाही हवेत. माध्यमांनी ही बातमी सनसनाटी वाटावी म्हणून "डार्विनचा उत्क्रांतीवाद मोडीत काढणारा शास्त्रज्ञ" अशी प्रसिद्धी गुल्ड ह्यांना दिली. न्यायालयात त्यांची तपासणी चालू असताना गुल्ड म्हणाले, "उत्क्रांती झाली नाही, असं मी कधीच म्हणालो नाही. उलट हाताशी कुठलीही साधने नसताना उत्क्रांती हा विचार मांडणे हे प्रज्ञावंताचेच काम आहे, पण आता गुणसूत्रे आणि जनुकांतील बदल पाहता येतात, त्यामुळे उत्क्रांती झाली पण ती प्रक्रिया डार्विन यांना वाटत होती तितकी साधी, सरळ आणि सोपी नव्हती, असं मी म्हणतो. गुल्डच्या या सिद्धांताच्या स्पष्टीकरणामुळे खटला भरणाऱ्या धर्ममार्तंडांच्या तोंडचे पाणी पळाले. यानंतर त्यांनी उत्क्रांतीला प्रायोगिक आधार नाही, असा मुद्दा उपस्थित केला आणि उत्क्रांती शिकवायची तर बुक ऑफ जेनेसिसमधला विश्वनिर्मितीचा सिद्धांतही शिकवला जायला हवा, असा मुद्दा मांडला. न्यायालयाने हे मुद्दे फेटाळून लावले. तसेच उत्क्रांती ही वैज्ञानिक बाब आहे तर क्रिएशनिझम म्हणजे बायबलप्रणीत विश्वनिर्मिती ही धार्मिक बाब आहे, तेव्हा दोघांना एकाच पारड्यात टाकणे योग्य नाही, असा निकाल दिला. असे असले तरी अजूनही हा वाद मधून मधून डोकं वर काढतोच, पण आता त्याच्याकडे फारसे गांभीर्यानं बघितलं जात नाही, हे विशेष!

# लोकशाहीर विठ्ठल उमप फाउंडेशनचे पुरस्कार जाहीर

## २६ नोव्हेंबर रोजी ठाणे येथे वितरण समारंभ

आधुनिक केसरी न्यूज



**अहमदनगर :** अहमदनगर जिल्ह्याचे भूमिपुत्र दिवंगत लोकशाहीर विठ्ठल उमप फाउंडेशन तर्फे देण्यात येणारा मृदगंध जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर यांना तर गायक सुदेश भोसले, तमाशा कलावंत आतांबर शिराढोणकर, अभिनेते सुनील राघवन, चिन्मय सुर्वे, सामाजिक कार्यकर्त्या अनुराधा भोसले यांना मृदगंध सामाजिक पुरस्कार तसेच गायिका अभिनेत्री केतकी माटेगावकर हिला मृदगंध नवोन्मेष पुरस्कार जाहीर झाला आहे.

लोकशाहीर विठ्ठल उमप फाउंडेशनचे अध्यक्ष तथा शाहीर नंदेश उमप यांनी मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. रविवार दिनांक २६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता ठाणे येथील डॉ. काशिनाथ घाणेकर सभागृहात मृदगंध पुरस्कार वितरण व लोकशाहीर विठ्ठल उमप स्मृती संगीत सोहळा संपन्न होणार आहे. प्रसिद्ध अभिनेत्री व निवेदिका समीरा गुजर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभेच्या उपसभापती निलम गोऱ्हे, उद्योग मंत्री ना. उदय सामंत, मुंबई भाजपचे अध्यक्ष आ. आशिष शेलार, ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त अभिजीत बांगर, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी आदी मान्यवर या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

यावेळी डॉ. सलील कुलकर्णी आणि संदीप खरे यांचा 'आयुष्यावर बोलू काही' हा कवितांचा विशेष कार्यक्रम होणार असून शाहीर बापू जाधव यांची शाहिरी, खुशाबा यांच्या आदिवासी नृत्याचे सादरीकरण होणार आहे. लोकशाहीर विठ्ठल उमप यांनी लोककलेसाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. ते जेव्हा रंगमंचावर लोककला सादर करण्यासाठी उभे राहायचे तेव्हा एक चैतन्य संचारायचं. या चैतन्याचा शोध घेत विविध क्षेत्रात आपले बहुमूल्य योगदान देणाऱ्या कलावंतांचा विविध पुरस्कार देऊन मानसन्मान करणे ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे, असे नंदेश उमप म्हणाले.



# पाझर तलावांची कामे रखडली

## आ. खोसकर यांची राज्यपालांकडे निधीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** इगतपुरी-त्र्यंबकेश्वर तालुक्यांत गेल्या काही वर्षांपासून पाझर तलावांची अनेक कामे रखडली आहेत. या कामांना निधी उपलब्ध होत नसल्याने ही कामे शासन दरबारी प्रलंबित आहे. या कामांना निधी उपलब्ध झाल्यास सिंचनाचा बहुतांश प्रश्न मार्गी लागुन शेतकऱ्यांना फायदा होईल म्हणुन निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी आमदार हिरामण खोसकर यांनी राज्यपाल रमेश बैस यांच्याकडे प्रत्यक्ष भेटीत केली. या दोन्ही तालुक्यांतील अनेक गावांमध्ये सिंचनाची सोय नसल्याने नागरिकांना रोजगारासाठी स्थलांतरित व्हावे लागत आहे. यामुळे त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येत असल्याने मुलांचे शिक्षण होऊ शकत नाही. शेतीपीक वार्षिक एकच असल्याने वर्षभर त्यांना बाहेर रोजगारासाठी जावे लागत आहे. इगतपुरी - त्र्यंबकेश्वरमध्ये सरासरी तीन हजार ते साडेचार हजार मिलिमीटरपेक्षाही जास्त पाऊस पडत असल्याने पावसाचे पडणारे पाणी हे समुद्राला मिळले जाते. तेच पाणी अडवून व पाझर तलावांचे जाळे निर्माण केल्यास पिण्याच्या पाण्यासह शेतीकरिता सिंचनाची समस्या दूर होणार आहे. आदिवासी बांधवांची उन्नती यामुळे रखडली आहे. मतदारसंघातील आठ योजनांकरिता निधी उपलब्ध अ करून दिल्यास मतदारसंघातील अनेक कि गावे हे सुजलाम् सुफलाम् होतील. यातून मतदारसंघाच्या नागरिकांचे उत्पन्न वाढून शेतकऱ्यांना आर्थिक सुबत्ता वाढीसाठी सहकार्य होईल. के आदिवासी क्षेत्राचा आपला अभ्यास दांडगा असल्याने आपण याबाबतीत लक्ष घालून शासनास सूचना न द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे आमदार हिरामण खोसकर यांनी राज्यपाल रमेश बैस यांच्याकडे केली आहे.

# 29 नोव्हेंबर रोजी बल्लारपूर येथे जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी जिल्हास्तरावर जिल्हा युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. त्याअनुषंगाने 29 नोव्हेंबर 2023 रोजी सांस्कृतिक सभागृह, नगर परिषद, बल्लारपूर येथे जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. युवकांचा सर्वांगीण विकास करणे, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वृध्दींगत करणे याकरीता युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. तसेच सदर युवा महोत्सव हा जिल्हास्तर, विभागस्तर, राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरापर्यंत आयोजीत करण्यात येत असतो. सन 2023 हे वर्ष संयुक्त राष्ट्र संघाने आंतरराष्ट्रीय पौष्टीक तृणधान्य वर्ष घोषित केले असल्याने राष्ट्रीय युवा महोत्सवात महाराष्ट्र राज्यासाठी, तृणधान्य उत्पन्न वाढीसाठी विज्ञानाचा वापर, सामाजिक विकासात विज्ञानाचे योगदान ही संकल्पना दिलेली आहे. या संकल्पनेवर आधारीत जिल्हास्तरावर युवा महोत्सवात सहभागी युवकांच्या कला प्रकारानुसार स्पर्धा आयोजीत करण्यात येणार आहे, असे जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड यांनी कळविले आहे.

जिल्हास्तर युवा महोत्सवामध्ये समाविष्ट असलेले कलाप्रकार : सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये 1. समूह लोकनृत्य, 2. वैयक्तिक सोलो लोकनृत्य, 3. लोकगीत, 4. वैयक्तिक सोलो लोकगीत. कौशल्य विकास मध्ये 1. कथाकथन, 2. पोस्टर स्पर्धा, 3. वक्तृत्व स्पर्धा (इंग्रजी व हिंदी),4. फोटोग्राफी. संकल्पना आधारीत स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्यासाठी 1. तृणधान्य उत्पन्न वाढीसाठी विज्ञानाचा वापर,2. सामाजिक विकासात विज्ञानाचे योगदान. युवा कृती कार्यक्रमाअंतर्गत 1. हस्तकला, 2. वस्त्रोद्योग,3. ॲग्रो प्रोडक्ट या प्रकाराचा समावेश आहे.




# गोशीन रियू कराटे असोसिएशन इंडियातर्फे राष्ट्रीय स्पर्धा व ट्रेनिंग कॅम्पचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** नवीन पनवेल स्टार हॉटेल येथे गोशीन रियू कराटे असोसिएशन इंडियातर्फे ३५ वी राष्ट्रीय स्पर्धा व ट्रेनिंग कॅम्प दिनांक १७,१८,१९ नोव्हेंबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आले होते. या राष्ट्रीय स्पर्धेसाठी बेंगलोर, चेन्नई, गुजरात, तामिळनाडू, रायगड ठाणे या राज्यातून व जिल्ह्यातून विद्यार्थी आले होते. सदर स्पर्धेचे उद्घाटन शिहान वसंथन मलेशिया आणि सिंगापूर देशाचे कोच, साई शेठ, नगरसेवक अजय बहिरा, जितेंद्र शेठ फडके (लायन ग्रुप महाराष्ट्र अध्यक्ष), सुशील म्हात्रे (लायन ग्रुप उरण अध्यक्ष) यांनी केले. विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन सिहान वसंथन (मलेशिया) व ओस्ट्रेलिया देश्याचे कोच यांनी केले. उरण व पनवेलच्या विद्यार्थ्यांनी कुमिते व काता प्रकारात पदके पटकाविली. वेदिका वेहले एक सिल्वर एक ब्रांझ मेडल, सृष्टी सरोज ब्रांझ आणि सिल्वर मेडल, कार्तिकी पाटील एक सिल्वर एक ब्रांझ मेडल, प्रीषा भोईर दोन ब्रांझ मेडल, वेदा पाटील एक सिल्वर एक ब्रांझ मेडल, अद्या ठाकूर एक सिल्वर एक ब्रॉन्झ मेडल, निमेश पाटील एक सिल्वर मेडल, नैतिक गावंड एक सिल्वर एक ब्रांझ मेडल, आर्यन पाटील दोन ब्रांझ मेडल, नैतिक गावंड दोन सिल्वर मेडल, निकिता कोळी एक सिल्वर एक ब्रॉन्झ मेडल, शितल गणेशकर दोन सिल्वर मेडल, वेदा ठाकरे एक सिल्वर एकब्रॉन्झ मेडल, हृद्वी म्हात्रे दोन ब्राझ मेडल, सोज्वल पावस्कर एक सिल्वर एक ब्रांझ मेडल, भार्गवी मोकल एक गोल्ड एक ब्रांझ मेडल, साक्षी पंडित एक गोल्ड एक ब्रॉँझ मेडल, नेत्रा गोल्ड आणि ब्राझ मेडल, आर्या गावंड दोन गोल्ड मेडल, वैदेही घरत एक गोल्ड एक ब्रांझ मेडल, स्वरा म्हात्रे एक गोल्ड मेडल, श्लोक ठाकूर दोन गोल्ड मेडल, पियुष ठाकूर एक गोल्ड एक ब्रॉँझ मेडल, अनिश पाटील एक गोल्ड एक सिल्वर मेडल, रोहित घरत एक गोल्ड मेडल, दोन गोल्ड मेडल, परेश पावसकर एक गोल्ड एक सिल्वर मेडल, सुजित पाटील गोल्ड मेडल, गोपाळ म्हात्रे गोल्ड मेडल अशी पदके पटकाविली.

# प्रदूषण करणाऱ्या १३२ वाहनांवर कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** हवेची गुणवत्ता कायम राखण्यासाठी उच्च न्यायालयाने आखून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात ठाणे महापालिकेने कारवाईचा बडगा उगारण्यास सुरूवात केली आहे. त्यानुसार गेल्या काही दिवसात हवा प्रदूषणास कारणीभूत असलेल्या राडारोडा वाहतूक करणाऱ्या १३२ वाहनांवर पालिकेने कारवाई करून ४ लाख ८३ हजार रुपयांचा दंड महापालिकेने वसूल केला आहे. तर शासकीय प्रकल्पाच्या ठेकेदारांवरही दंडात्मक कारवाई केली आहे. हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने मार्गदर्शक तत्वे आखून दिल्यानंतर त्याच्या अंमलबजावणीकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी महापालिकेने भरारी पथके तयार केली आहेत. या पथकांच्या माध्यमातून गेल्या काही दिवसांपासून कारवाई केली जात आहे. त्यानुसार, शहराच्या वेशीवरील आनंदनगर, मॉडेला चेक नाका या ठिकाणी पथक तैनात करण्यात आले असून या पथकाने राडारोडा वाहून नेणाऱ्या १३२ वाहनांवर कारवाई केली आहे. त्यांच्याकडून ४ लाख ८३ हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे.ठाणे महापलिका हद्दीत मेट्रो, रस्ते दुरुस्ती, नव्याने रस्ते बांधणे अशी विविध ८३ ठिकाणी कामे सुरु आहेत. त्यापैकी १३ ठिकाणी पालिकेच्या भरारी पथकाकडून पाहणी करण्यात आली. यातील ९ ठिकाणी नियमांचे पालन होत नसल्याचे समोर आले.

# अनधिकृत लेआऊटवरील बांधकामावर मनपाची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महानगरपालिकेच्या वतीने अनधिकृत ले आऊट वरील बांधकामावर कारवाई करण्यात आली असुन अनधिकृत रीतीने उभे करण्यात आलेले मार्कींगचे सिमेंट खांब तोडण्याची कारवाई मनपामार्फत करण्यात आली आहे.

ठक्कर कॉलनी येथे ईरई नदी पात्राजवळ मौजा गोविंदपुर रीठ सर्वे नंबर ७३/१ तसेच जवळच असलेल्या नाल्याजवळील पुलाच्या बाजुला चांदा रयतवारी सर्वे नंबर ४९ असलेल्या भूखंडावर अनधिकृत ले आउट टाकुन प्लॉट विक्रीचा व्यवसाय सुरू केला असल्याची माहिती मनपा पथकास मिळाली होती. त्यानुसार पाहणी केली असता सदर भूखंड हा पूरग्रस्त भागात असल्याने यावर कुठल्याही स्वरूपाची खरेदी विक्री करता येत नाही. यासंबंधी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम ५२ अन्वये अनधिकृत बांधकाम करणाऱ्यास नोटीस देण्यात आली होती. मात्र नोटीस स्वीकारण्यास सदर बांधकामदाराने नकार दर्शविला होता त्यामुळे सदर कारवाई करण्यात आलेली आहे. सदर ले आऊटवर प्लॉटची विक्री करण्यास मार्कींग सुद्धा करण्यात आली होती.

चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की केवळ नोटरीच्या आधारे कुठल्याही स्वरूपाची खरेदी विक्रीची कारवाई करू नये भविष्यात यासंबंधी कुठल्याही संशय उद्भवल्यास याची जबाबदारी पुर्णपणे विक्री करून देणार व विक्री करून घेणार यांची राहील. दुय्यम निबंधक कार्यालयातून नोंदणी होत असलेल्या भूखंडाचीच खरेदी अथवा विक्री करण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे. सदर कारवाई आयुक्त विपीन पालीवाल यांच्या मार्गदर्शनात सहायक आयुक्त सचिन माकोडे,सहायक नगररचनाकार सारिका शिरभाते, अतिक्रमण निर्मूलन अधिकारी संतोष गर्गेलवार तसेच अतिक्रमण पथकाद्वारे करण्यात आली. शहरात जिथेही अनधिकृत ले आऊट आहेत तिथे कारवाई सुरु राहणार असल्याने अनधिकृत ले आऊट वर कुठल्याही स्वरूपाचे बांधकाम आढळल्यास त्यावर तात्काळ कारवाई केली जाणार आहे. तसेच नागरिकांना शहरातील अनधिकृत ले आउट संबंधी माहिती असल्यास ती मनपास देण्याचे आवाहन मनपामार्फत करण्यात येत आहे.



# संतश्रेष्ठ तुकोबांच्या सदेह वैकुंठगमन सोहळ्याच्या नारळासाठी नाशिक, नगर जिल्ह्यातून भाविकांची मांदियाळी देहूला जाणार

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड :** संतश्रेष्ठ तुकोबांच्या वैकुंठ गमनाला सन २०२४ - २५ दरम्यान ३७५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने निफाड तालुक्यातीलभरवसफाटायेथे दि.२ एप्रिल ते दि. ८ एप्रिल २०२४ या कालावधीत जगद्गुरु तुकोबाराय त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी वैकुंठगमन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्ताने सप्ताहाचे नारळ घेण्यासाठी नाशिक व नगर जिल्ह्यातील वारकरी संप्रदायाची मांदियाळी मंगळवार दि.२८ नोव्हेंबर रोजी मोठ्या संख्येने देहू येथे उपस्थित राहणार आहे. याप्रसंगी दिग्गज कीर्तनकार, प्रवचनकार व भजनी मंडळांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आव्हान ह.भ.प ज्ञानेश्वर माऊली ठाकरे व ह.भ.प मधुकर महाराज गडाख यांनी केले आहे. जगद्गुरु तुकोबाराय त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी वैकुंठगमन सोहळ्याचा मान नाशिकला प्रथमच मिळत असूनभरवसफाटायेथे सोहळ्याचे आयोजन नियोजित असून जिल्ह्यातील हा पहिलाच कार्यक्रम असल्याने लाखो उपस्थितांचे नियोजन करण्यात येणार आहे. आद्यशंकराचार्य स्थापित चार धर्मपीठातील जगद्गुरुंना या सोहळ्याचे निमंत्रण देण्यात येणार आहे. तुकोबारायांचे वंशज देहूकर महाराज यांचेसह सर्व संतांचे वंशज, संस्थानांचे पदाधिकारी, मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विरोधी पक्षनेते, केंद्रीय मंत्री आदी राजकीय नेत्यांची उपस्थिती या सोहळ्यास राहणार आहे. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी निफाड, येवला, चांदवड, सिन्नर, कोपरगाव या पाच तालुक्यांतील नागरिकांनी पुढाकार घेतला आहे. या सोहळ्यात अखंड हरिनाम सप्ताह, श्री तुकोबाराय जीवन चरित्र कथा व पाच हजार गाथा वाचकांचे संगीत गाथा पारायण होणार आहे.




कार्यक्रमाच्या सुरुवातीस श्री क्षेत्र देहू येथून पायी ज्योत आणण्यात येणार असून या पादुका निफाड, येवला, चांदवड, सिन्नर, कोपरगाव या पाच तालुक्यांतुन हेलिकॉप्टरने भ्रमण करून कार्यक्रमस्थळी आठ दिवस दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहेत. दि.२ एप्रिल ते दि. ८ एप्रिल या कालावधीत संपन्न होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या काळात नाशिक जिल्ह्याअंतर्गत १५ तालुक्यांतून प्रत्येकी एक आदर्श कीर्तनकारास 'धन्य तुकोबा समर्थ' हा मानाचा पुरस्कार सोहळ्याच्या वतीने व श्री तुकोबारायांच्या वंशजांच्या हस्ते दिला जाणार आहे. दैनंदिन कार्यक्रमासाठी वारकरी व भाविकांची मोठया प्रमाणावर उपस्थिती राहणार असल्याने आजूबाजूच्या तालुक्यातील, गावातील नागरीकांच्या सहकार्याने दैनंदिन पंगतीचे नियोजन ठरविण्यात आले आहे. व्यसनमुक्त होऊ पाहणाऱ्या लोकांना दारूबंदी, आणि व्यसनमुक्तीची शपथ देऊन भगवंत कार्यात सहभागी करून घेण्यात येणार आहे. त्या निमित्ताने वारकरी भूषण ह.भ.प ज्ञानेश्वर माऊली कदम यांच्या मार्गदर्शनाखाली संत तुकाराम महाराज यांचे वंशज सप्ताहाचे नारळ दिनांक २८ नोव्हेंबरला श्रीक्षेत्र देहू येथे नाशिक जिल्हा व कोपरगाव तालुक्याला देणार आहे. या कार्यक्रमास भाविकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित रहावे यासाठी ह.भ.प. वैराग्यपाईक ज्ञानेश्वर माऊली ठाकरे व ह.भ.प.मधुकर महाराज गडाख हे गावागावात जाऊन आमंत्रण देत आहेत.

## अतिक्रमणाविरोधात आरटीओ, पोलीस, मनपाची कारवाई

### १० चार चाकी वाहनांवर दंड, ७ दुचाकी वाहने जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शहरात रस्त्यावर अतिक्रमण करून वाहने विक्री करणाऱ्यांवर प्रादेशिक परिवहन कार्यालय, पोलीस प्रशासन, वाहतूक पोलीस व चंद्रपूर महानगरपालिकेद्वारे संयुक्त कारवाई करण्यात आली असुन नागपूर रोडवर जुनी वाहने विक्रीचा व्यवसाय करणाऱ्यांची ७ वाहने जप्त करण्यात आली. नागपुरकडे जाणाऱ्या महत्त्वाच्या मार्गावर अतिक्रमण, जुनी चार चाकी दुचाकी वाहने विक्री करण्याची दुकाने अवैधरित्या थाटण्यात येतात. दुकानासमोर पार्किंग करणाऱ्या नागरिकांची वाहने थोड्या वेळापुरती वाहने दुकानासमोर उभी राहतात मात्र विक्री करणाऱ्यांची वाहने पुर्ण वेळ रस्त्यावर उभी राहतात यामुळे या अतिक्रमणांचा वाहतुकीला अडथळा निर्माण होऊन वाहतूक कोंडी होत असल्याचे लक्षात घेऊन ८ ते १० चारचाकी



वाहनांवर दंड तर पल्सर, पॅशन - प्रो, ॲक्टिव्हा अश्या ७ दुचाकी जप्त करण्याची कारवाई आरटीओ मार्फत करण्यात आली असुन जोपर्यंत दंडाचा भरणा होणार नाही तोपर्यंत या वाहनांची विक्री होऊ शकणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे फुटपाथवर छोटी हातगाडी, मोठे ठेले उभे करून खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्यांना २४ तासांच्या आत त्यांचे अतिक्रमण हटविण्याच्या सुचना देण्यात आल्या असुन न हटविल्यास छोटे - मोठे ठेले व त्यांचे साहीत्य जप्त करण्यात येणार आहे. हे विक्रेते येणाऱ्या ग्राहकांना बसण्यास रस्त्यावर खुर्च्या ठेवतात त्यामुळे वाहतुकीस उपलब्ध रस्त्याचे प्रमाण आपसुकच कमी होते त्यामुळे पुढील २४ तासानंतर कारवाई करण्यात येणार आहे. जे जुनी चार चाकी व दुचाकी विक्री करणारे स्थायी दुकानदार आहेत त्यांनी आपल्या दुकानासमोर कोणतेही वाहन विक्रीकरिता लावु देऊ नये,वाहन विक्री करावयाची असल्यास विक्रीकरिता स्वतः जागा उपलब्ध करून घेण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे. सदर कारवाई सहायक आयुक्त सचिन माकोडे, वाहतुक पोलीस निरीक्षक प्रवीण पाटील, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अतिक्रमण निर्मुलन अधिकारी संतोष गर्गेलवार तसेच मनीष शुक्ला, अनिल खोटे, भरत बिरिया, बंडू चहरे विक्रम महातव, डोमा विजयकर, अमरदीप साखरकर यांनी केली.

## वीजपुरवठा खंडित होण्याच्या बनावट मेसेजपासून सावधान

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सायबर भामट्यांकडून वीजग्राहकांना बनावट मेसेज पाठवून आर्थिक फसवणूक करण्याचे प्रकार होत आहेत. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत वैयक्तिक मोबाईल क्रमांकावरून प्राप्त झालेल्या फसव्या मेसेजला प्रतिसाद देऊ नये, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

'मागील महिन्याचे वीजबिल अपडेट नसल्याच्या कारणावरून वीजपुरवठा खंडित करण्यात येणार आहे. करिता ताबडतोब सोबत दिलेल्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा', असे बनावट मेसेज नागरिकांना प्राप्त होत आहेत. यात वीजबिल भरण्यासाठी वैयक्तिक मोबाईल क्रमांकावरून ऑनलाईन पेमेंटसाठी बनावट लिंक पाठवून ग्राहकांना सॉफ्टवेअर डाऊनलोड करण्यास सांगितले जाते. त्यास प्रतिसाद दिल्यास मोबाईल किंवा संगणक हॅक करून बँक खात्यातील रक्कम लंपास होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे वीजग्राहकांनी अशा बनावट मेसेजकडे पूर्णपणे दुर्लक्ष करावे. गेल्या काही महिन्यांत नागरिकांना असे बनावट मेसेज मिळण्याचे प्रकार वाढले आहेत. मात्र कोणत्याही वैयक्तिक मोबाईल क्रमांकावरून अशा प्रकारचे 'एसएमएस' व व्हाट्सअप मेसेज पाठवण्यात येत नाहीत, असे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे. या प्रकरणी सायबर सेलमध्ये याआधी तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.

महावितरणकडून केवळ मोबाईल क्रमांकाची नोंदणी केलेल्या वीजग्राहकांनाच सिस्टिमद्वारे पूर्वनियोजित देखभाल व दुरुस्ती, तांत्रिक किंवा अन्य कारणांमुळे वीजपुरवठा खंडित झाल्यास तो पूर्ववत होण्यास लागणारा संभाव्य कालावधी तसेच दरमहा वीजबिलांची रक्कम, स्वतःहून मीटर रीडिंग पाठविण्याचे ग्राहकांना आवाहन, मीटर रीडिंग घेतल्याची तारीख व वापर केलेली एकूण युनिट संख्या, वीजबिलाची रक्कम, देय दिनांक, वीजपुरवठा खंडित करण्याची रीतसर नोटीस आदींची माहिती 'एसएमएस'द्वारे पाठवण्यात येते आणि त्याचा सेंडर आयडी (SENDER ID) हा 'एमएसईडीसीएल'(MSEDCL) (उदा. VM-MSEDCL, VK-MSEDCL, AM-MSEDCL, JM-MSEDCL) असा आहे. तसेच या अधिकृत मेसेजमधून वीजग्राहकांना किंवा नागरिकांना महावितरणच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या वैयक्तिक मोबाईल क्रमांकावर संपर्क करण्याबाबत कळवले जात नाही. ध्या वैयक्तिक मोबाईल क्रमांकावरून पाठवल्या जाणाऱ्या बनावट मेसेजला प्रतिसाद देऊ नये. बिलाच्या पेमेंटसाठी लिंक किंवा कोणतेही सॉफ्टवेअर डाऊनलोड करू नये. तसेच मेसेजमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही वैयक्तिक मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू नये. काही शंका व तक्रारी असल्यास वीजग्राहकांनी २४ तास सुरू असलेल्या १९१२, १८००-२१२-३४३५ किंवा १८००-२३३-३४३५ या टोल फ्री क्रमांक किंवा नजीकच्या कार्यालयांशी संपर्क साधावा.

## मयत मनोहर वाणी यांच्या कुटुंबीयांची जोरगेवार यांनी घेतली भेट

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जूनोनाच्या जंगला लगत असलेल्या शनी मंदिरात गेलेल्या 53 वर्षीय मनोरह वाणी यांचा वाघाच्या हल्यात मृत्यू झाला होता. दरम्यान आज गुरुवारी आमदार किशोर जोरगेवार यांनी मृतक मनोहर वाणी यांच्या बाबूपेठ येथील राहत्या घरी सांत्वनपर भेट देत परिवाराला आर्थिक मदत केली.

यावेळी मृतकाची पत्नी उज्वला वाणी, वडील विक्रम वाणी व इतर कुटुंबातील सदस्यांसह वन परिक्षेत्र अधिकारी जि. आर. नागमकर, यंग चांदा ब्रिगेडचे अमोल शेंडे, राशिद हुसेन, अब्बास शेख, अशोक अक्केवार, महेश वासलवार यांची उपस्थिती होती. रविवारी जुनोना रोडच्या कडेला असलेल्या शनी मंदिरात दर्शन घेण्यासाठी गेलेल्या बाबुपेठ येथील रहिवासी मनोहर वाणी यांचा वाघाच्या हल्यात मृत्यू झाला होता. त्यानंतर वनविभागाने घटनास्थळी दाखल होत. मृतदेह शवविच्छेदना करिता जिल्हा सामान्य रुग्णालायत दाखल केला होता. दरम्यान आज गुरुवारी आमदार किशोर जोरगेवार यांनी मृतक मनोहर यांच्या घरी सांत्वतपर भेट दिली. यावेळी त्यांनी मृतकच्या पत्नी उज्वला वाणी यांना आर्थिक मदत केली. सोबतच शासनातर्फे मिळणार असलेली मदत लवकर मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी म्हटले आहे. यावेळी त्यांनी जिल्हा शल्य चिकित्सक महादेव चिंचोळे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत मृतक मनोहर यांचा शवविच्छेदन अहवाल व इतर कागदपत्रे वनविभागाला लकवर उपलब्ध



करुन देण्याच्या सुचना केल्या आहे. सदर कागदपत्रे प्राप्त होताच शासनाची उर्वरित आर्थिक मदत देण्याच्या प्रक्रियेला गती देण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी नागमकर यांना केल्या आहे. मृतकाच्या पत्नीला वन विभागाने कंत्राटी पद्धतीवर काम देण्याच्या सुचनाही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी केल्या आहे.

## पाथर्डी शिवारात 'तो' बिबट्या जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** शहर परिसरात बिबट्याचे दर्शन सातत्याने होत असतांना नाशिककर बिबट्याच्या दहशतीखाली आहे. गुरूवारी पाथर्डी परिसरात पहाटेच्या सुमारास बिबट्या जेरबंद झाल्याने वनविभागासह नागरीकांनी सुटकेचा श्वास सोडला.
गेल्या काही दिवसांपासून पाथर्डी परिसरातील मळे परिसरात बिबट्याचा वावर असल्याची तक्रार परिसरातील नागरीक करत होते. हा परिसर वर्दळीचा असल्याने विद्यार्थी, नोकरदार, महिला अन्य नागरीक यांना सातत्याने या परिसरातून ये जा करावी लागते. वनविभागाने नागरीकांच्या तक्रारीची दखल घेत परिसराची पाहणी केली असता बिबट्याचा पावलाचे ठसे आढळले. त्यानुसार तीन दिवसांपूर्वी पाथर्डी परिसरातील नवले यांच्या मळ्यात वनविभागाकडून पिंजरा लावण्यात आला. गुरूवारी पहाटेच्या सुमारास बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद झाला. ही माहिती परिसरातील नागरीकांनी वनविभागाला देताच पथक घटनास्थळी दाखल झाले. बिबट्याला सुरक्षित रित्या ताब्यात घेतले आहे. बिबट्या नर असून सहा वर्षाचा असल्याची माहिती वनअधिकारी अनिल अहिरराव यांनी दिली. त्याच्या वैद्यकीय तपासणी नंतर त्याला नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येणार आहे.



हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# व्हॉईस ऑफ मीडिया वाशिम चमूचा बारामतीत सन्मान





आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** पत्रकारिता आणि पत्रकार यांच्या न्याय हक्कासाठी लढा उभाकरणारी व्हॉईस ऑफ मीडिया ही देशातील सर्वात जास्त सदस्य संख्या असलेली राष्ट्रीय संघटना आहे. अल्पावधीतच आपल्या कार्य आणि कर्तृत्वाच्या बळावर देशभरात नावारूपास आलेल्या या संघटनेचे जिल्हाध्यक्ष भागवत मापारी आहेत. त्यांनी संपूर्ण जिल्ह्यात संघटनेच्या खुप मोठे जाळे तयार केले आहे. त्यांच्या संघटन कौशल्याची पावती म्हणून त्यांचा बारामती येथील अधिवेशनात संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के आणि इतर मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला आहे. तद्वतच संघटनेसाठी प्रत्येक कार्यात सदैव तत्पर राहणाऱ्या व्हॉईस ऑफ मीडिया वाशिम चमूचा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला आहे.

व्हॉईस ऑफ मीडिया ही भारतातील सर्वाधिक सदस्य संख्या असलेली पत्रकार संघटना आहे. या संघटनेचे वाशीम जिल्हाध्यक्ष भागवत मापारी आहेत. त्यांनी व्हॉईस ऑफ मीडियाची जिल्हाभर बांधणी केली. अनेक पत्रकार जोडले. सर्वांना सोबत घेऊन त्यांनी उत्कृष्ट कार्यक्रमदेखिल राबविले. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांचा सत्कार व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, व्हॉईस ऑफ मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के यांनी केला. संपूर्ण वाशीम टीमचे भरभरुन कौतूक केले. हा कार्यक्रम व्हॉईस ऑफ मीडियाच्या राज्य शिखर अधिवेशनात बारामती येथे (ता.19) पार पडला. याप्रसंगी जिल्ह्यातील व्हॉईस ऑफ मीडिया वाशीम जिल्हाध्यक्ष भागवत मापारी, रेडिओ विंगचे प्रदेशाध्यक्ष इरफान सय्यद, जिल्हा उपाध्यक्ष संतोष चराटे, अर्जुन खरात, विनोद बोडखे, रुपेश बाजड, दीपक पाटील शेवाळे, ताराचंद वर्मा, वसंत खडसे, महादेव घुगे, फिरोज शहा, महेंद्र महाजन, राम वानखेडे, नाजीम भाई, फिरोज शहा, दीपक मापारी, नरेंद्र अंभोरे, मानोरा येथून पत्रकार माणिक डेरे, वसंत राठोड, योगेश देशमुख, संजय अलदर, अनिल राठोड , निखिल वानखडे, राजु ठाकरे,बबन देशमुख, विशाल मोरे आदी उपस्थित होते. वाशिम जिल्ह्यात पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी वेळोवेळी निवेदन दिले. यासोबतच, पत्रकारांचा दहा लाख रुपयांचा विमा काढला. येत्या डिसेंबरमध्ये विमा रिन्यूअल करण्यासाठी सुद्धा कार्यक्रम घेतल्या जाणार आहे. पत्रकारांचा कौटूंबिक स्नेह मिलन मेळावा सुद्धा यशस्वीरित्या पार पाडला, असे विविध कार्यक्रम वाशिमची टीम करत असल्यामुळे त्यांचा सन्मान करण्यात आला. व्हॉईस ऑफ मीडियाच्या राष्ट्रीय कार्यालयीन सचिव दिव्या भोसले, व्हॉईस ऑफ मीडिया साप्ताहिक विंगचे प्रदेशाध्यक्ष विनोद बोरे यांनी वाशीमच्या टीमचे अभिनंदन केले आहे. संपूर्ण महाराष्ट्रभरातून देखिल भागवत मापारी यांच्या टीमचे कौतूक केले जात आहे.



# छगन भुजबळांच्या भाषणाचा निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड :** लासलगाव येथे वेफको सेंट्रल ऑफिसमध्ये सर्व पक्षीय मराठा समाजाची बैठक पार पडली. या बैठकीत मंत्री छगन भुजबळ यांनी जालन्याच्या सभेत मराठा समाजावर व मनोज जरांगे पाटलांवर जी टीका केली त्याचा सर्वपक्षीय मराठा समाजाच्या वतीने निषेध व्यक्त केला. इथून पुढे भुजबळांच्या कोणत्याही कार्यक्रमाला मराठा समाजाचे नेते व कार्यकर्ते उपस्थित राहणार नाही कुठल्याही प्रकारचे सहकार्य करणार नाही असा ठरावही करण्यात आला. बैठकीस माजी आ.कल्याणराव पाटील, माणिक भाऊ शिंदे, नानासाहेब पाटील, जयदत्त होळकर, संभाजी पवार, अंबादास बनकर, संजय बापू होळकर व इतर सर्व मराठा समाजाचे नेते उपस्थित होते. सदर बैठकीत ललित दरेकर, विकास रायते, प्रवीण कदम शंकरराव दरेकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रस्तावना डॉ. सुजित गुंजाळ यांनी केली. सर्व ज्येष्ठ नेत्यांनी आम्ही मराठा समाजासोबतच आहोत आणि कायम राहणार असून भुजबळांनी सर्व समाज गुण्यागोविंदाने नांदत असताना दोन समाजामध्ये वाद किंवा तेढ निर्माण होईल असे वक्तव्य करू नये समाजापेक्षा कोणीही मोठा नाही या भावनेने वरील भूमिका मांडली आणि सर्वांनी समर्थन दिले. तरी सर्व नेत्यांचे सकल मराठा समाजाच्या वतीने आभार व्यक्त करण्यात येत आहे.

# संगणक परिचालकांचे बेमुदत कामबंद आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** शासनाने आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पातील संगणकपरिचालकांच्या न्याय मागण्या मान्य करण्यासाठी १७ नोव्हेंबर २०२३ पासुन राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करण्यात येत आहे. या बाबतचे निवेदन गुरुवार दि. 16 रोजी महाराष्ट्र राज्य संगणक परिचालक संघटनेच्या वतीने फुलंब्री गटविकास अधिकारी विनायक राठोड यांना देण्यात आले आहे. यावलकर समितीने ग्रामपंचायतीच्या सुधारित आकृतीबंधाबाबत शासनास सादर केलेला अहवाल दि.३१ मे २०१८, (२) ग्रामविकासमंत्री गिरीशजी महाजन दिलेले लेखी आश्वासन दि.२८ डिसेंबर २०२२, (३) ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षेखाली झालेल्या बैठकीचे इतिवृत्त दि. ११ जानेवारी २०२३ ४) उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या सोबत झालेली बैठक दि.०१ मार्च वरिल विषयास व संदर्भास अनुसरून विनंती पूर्वक निवेदन देण्यात येते की, ग्रामविकास व माहिती तंत्रज्ञान विभागाच्या माध्यमातून देण्याचे कार्य संगणकपपरिचालक अविरतपणे करत आहेत ग्रामपंचायतीचे ऑनलाईन व ऑफलाईन व इत्तर अनेक प्रकारचे कामे विभागाने नेमून दिलेले काम संगणकपरिचालक प्रमाणिकपणे करत आहेत, ग्रामीण भागातील सुमारे ७ कोटी जनतेला विविध प्रकारच्या सेवा सुरू असलेल्या पूर्वीच्या संग्राम व सध्याच्या आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पात मागील १२ वर्षापासुन ग्रामपंचायत स्तरावर ग्रामविकास प्रामाणिकपणे करून सुद्धा केवळ ६९३० हजार रुपये हे या महागाईच्या काळात अतिशय तुटपुंजे मानधन मिळते तेही केव्हाच वेळेवर मिळत नाही. संगणकपरिचालक हे ग्रामपंचायत मध्ये बसून सर्व प्रकारचे कामे करत असल्याने त्यांना कर्मचारी दर्जा व किमान वेतन मिळणे आवश्यक आकृतीबंधात पदनिर्मिती करण्याची शिफारस केलेली आहे, त्यात ग्रामपंचायत स्तरावर माहिती तंत्रज्ञानाचा वाढता वापर पाहता शासनाच्या सर्व असून ग्रामविकास विभागाने स्थापन केलेल्या यावलकर समितीने २०१८ मध्ये या सर्व संगणकपरिचालकांना ग्रामपंचायतच्या सुधारित योजना नागरिकांना ऑनलाईन देण्याचे प्रमाण वाढले आहे, त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर डेटा एंट्री ऑपरेटर/संगणकपरिचालक या पदाची कायमस्वरूपी निर्मिती करून किमान वेतन देणे अत्यंत आवश्यक आहे, त्यासाठी शासन स्तरावर राज्य संघटनेच्या माध्यमातून अनेक वर्षांपासून मागणी करण्यात येत आहे त्याची दखल घेऊन शासनाने यावलकर समितीच्या शिफारशीनुसार डेटा एंट्री ऑपरेटर/संगणकपरिचालक या पदाची निर्मिती करण्यास व किमान वेतन देण्यास ग्रामविकासमंत्री ना. गिरीशजी महाजन साहेबाच्या अध्यक्षतेखालील ११ जानेवारी २०२३ च्या बैठकीत मान्यता दिली आहे.

ग्रामपंचायत स्तरावर काम करणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्याना किमान वेतन, कोतवाल, पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका व मदतनीस,आशा वर्कर व गट प्रवर्तक यांचे मानधन वाढ झाले आहे, परंतु शासनाने संगणकपरिचालकांचे मानधन सुद्धा वाढ न केल्याने संगणकपरिचालकांच्या मनात असंतोष निर्माण झाला आहे.हे ग्रामपंचायत स्तरावरील कर्मचारी आमचे बंधु – भगिनी आहेत, त्याच्या मानधनात बाढ झाली याचा आम्हाला आनंद आहे पण आम्हीच काय पाप केले ? अशी भावना संगणकपरिचालकांच्या मनात निर्माण झाली आहे. या वेळी तालुकाध्यक्ष शिवाजी जुंबड, उपाध्यक्ष रामेश्वर गव्हाड, सचिव अंकुश जगताप, सुरेश फुके, गोविंद अंभोरे, गजानन इधा, बाबासाहेब तुपे, आबाराव डकले, प्रकाश कापसे, शंकर कोंडके, वाहेद शहा, अनिल भिवसाने, ज्ञानेश्वर रसाळ आदींची उपस्थिती होती.

# सणासुदीत एसटीला ६ कोटींचे उत्पन्न

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** सणासुदीच्या काळात अमरावती जिल्ह्यातील विविध आगारांतून एसटीच्या प्रवासाला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून दैनंदिन उत्पन्नात सुमारे दीडपट वाढ झाली आहे. एसटी महामंडळाने जिल्ह्यात ११ ते २० नोव्हेंबर या कालावधीत ६ कोटी ८ लाख ९१ हजार रुपये इतके उत्पन्न मिळवले आहे. अमरावती जिल्ह्यात अमरावती, बडनेरा, परतवाडा, वरूड, चांदूर रेल्वे, दर्यापूर, मोर्शी आणि चांदूर बाजार असे एसटी महामंडळाचे आठ आगार आहेत. या आगारातजून ग्रामीण, शहरी व इतर लांब व मध्यम पल्ल्याच्या गाड्या सोडल्या जातात. यातून मोठ्या संख्येने प्रवासी प्रवास करतात. शहराचे वाढते नागरीकरण यासोबतच आता एसटी महामंडळाच्या बसेसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली आहे. तर दुसरीकडे, एसटी महामंडळाने महिला प्रवाशांसाठी तिकिटांमध्ये सवलत लागू केल्याने एसटीने प्रवास करणाऱ्या महिलांची संख्या वाढली आहे. विशेषतः दिवाळीच्या सुट्टया आणि सणासुदीच्या काळात गावी जाण्यासाठी व इतर ठिकाणी फिरायला जाण्यासाठी एसटीला प्राधान्य दिले जाऊ लागले आहे.



# पुरातन मंदिर, किल्ल्यांसाठी 57 कोटी 96 लक्ष रुपयांचा प्रस्ताव : मुनगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील पुरातन स्थळांचा कायापालट करण्यासाठी राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून 57 कोटी 96 लक्ष 95 हजार 375 रुपयांचा निधी प्रस्तावित करण्यात आला आहे. या निधीतून जिल्ह्यातील 14 पुरातत्व स्थळांचा विकास होणार आहे. यासंदर्भात मुनगंटीवार यांनी नुकताच नियोजन सभागृह येथे आढावा घेतला.

बैठकीला भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, महानगरचे अध्यक्ष राहुल पावडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संध्याताई गुरनुले,जिल्हाधिकारी विनय गौडा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, सहाय्यक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम., पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे, सहाय्यक संचालक अमोल गोटे आदी उपस्थित होते. चंद्रपूरला ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा आहे. गोंड राजा खांडक्या बल्लारशाह यांनी तेराव्या शतकात चंद्रपूर शहराची स्थापना केल्याचा उल्लेख इतिहासात आढळतो. जिल्ह्यात अनेक पुरातन मंदिर, प्राचीन गडकिल्ले व वास्तु आहेत. पालकमंत्री मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांमुळे आता त्यांचे रूप पालटणार आहे.

बैठकीत बोलताना मुनगंटीवार म्हणाले, पुरातत्व स्थळांचा विकास करताना कामाची गुणवत्ता, दर्जा आणि कामाची गती यावर स्थानिक नागरीकांनी लक्ष ठेवावे. पुरातत्व विभागाने प्रत्येक ठिकाणी पाच ते सहा नागरीकांची टीम तयार करावी. लोकसहभागातूनच या स्थळांचा विकास होईल, याबाबत नियोजन करावे. प्रत्येक ठिकाणी कामांची माहिती देणारा





एक फलक तर संबंधित ऐतिहासिक स्थळांची माहिती देणारा दुसरा फलक लावावा. यात 'क्यूआर कोड'चा समावेश असावा.

सिध्देश्वर मंदिराचा 'ब'वर्ग दर्जा करण्यासाठी प्रशासनाने प्रस्ताव सादर करावा. माणिकगड किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार करणे, चंद्रपूर महानगर पालिकेअंतर्गत असणाऱ्या तीन बारवचे काम उत्तम करावे, अशा सूचनाही पालकमंत्री मुनगंटीवार यांनी पुरातत्व विभागाला दिल्या.

**अर्थमंत्री असताना भरीव तरतूद :** राज्यातील ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळांचा विकास करण्याचे काम पुरातत्व विभागाकडे असते. सुरुवातीला या विभागाचे बजेट प्रतिवर्ष केवळ 22 कोटी रुपये होते. ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी आपल्या अर्थमंत्रीपदाच्या कार्यकाळात या विभागासाठी 500 कोटी रुपये मंजूर केले.

**गाईड प्रशिक्षण संस्था होणार :** राज्यातील ऐतिहासिक वारसा बघण्यासोबतच त्याची माहितीही नागरीकांना मिळाली पाहिजे. नागरीकांपर्यंत योग्य व अचूक माहिती जावी, यासाठी राज्यात गाईड प्रशिक्षण संस्था उभारण्याचे नियोजन आहे.

**कायापालट होणारी स्थळ :** सोमेश्वर मंदिर (राजुरा), महादेव मंदिर (बाबुपेठ, ता. चंद्रपूर), विष्णु मंदिर (माणिकगड, ता. जिवती), सिद्धेश्वर मंदिर (देव्हाडा, ता. राजुरा), माणिकगड किल्ला टप्पा 1 (ता. जिवती), माणिकगड किल्ला टप्पा 2, भवानी मंदिर (भटाळा, ता. वरोरा), ऋषी तलाव (लेणी) (भटाळा, ता. वरोरा), महादेव मंदिर (भटाळा, ता. वरोरा), शंकर मंदिर (भिसी, ता. चिमूर), गरुडस्तंभ (चंद्रपूर), खंडक्या बल्लारशाह समाधी (ता. बल्लारपूर), चंद्रपूर शहर व्यवस्थापन आराखडा (चंद्रपूर) आणि पापामिया टेकडी (ता. चंद्रपूर).

# 30 नोव्हेंबरपासून पशु वंध्यत्व निवारण शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** जिल्ह्यातील पशुपालकांकडील भाकड व वंध्यत्व पशुधनावर उपचार करुन ते उत्पादनात आणण्यासाठी जिल्ह्यात 30 नोव्हेंबरपासून पशु वंध्यत्व निवारण शिबीरे घेण्यात येणार आहे. या शिबीराचे 19 डिसेंबरपर्यंत मोहिम स्वरुपात आयोजन करण्यात येणार आहे. पशुपालकांकडील भाकड व वंध्यत्व जनावरांना उत्पादनात आणण्यासाठी वंध्यत्व निवारण शिबिराच्या आयोजनाच्या सूचना शासनाने दिल्या आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाकडून 30 नोव्हेंबर ते 19 डिसेंबर 2023 या कालावधीत जिल्ह्यातील प्रत्येक पशुवैद्यकीय दवाखाना,तालुका लघु पशुवैद्यकीय चिकित्सालय यांच्या कार्यक्षेत्रात पशु वंध्यत्व निवारण शिबीराचे मोहिम स्वरुपात आयोजन करण्यात आले आहे. भाकड जनावरांना उपचाराअंती उत्पादनात आणण्याच्या दृष्टीने प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश सर्व संस्था प्रमुखांना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी दिले आहेत.



# महाराष्ट्राच्या लोकवाद्याच्या संरक्षणासाठी भोपाळ येथे राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** शिक्षण मंत्रालय भारत सरकारच्या अंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद च्या क्षत्रिय शिक्षा शिक्षण संस्थान च्या वतीने दिनांक 17 नोव्हेंबर ते 22 नोव्हेंबर च्या दरम्यान "महाराष्ट्रातील लोकवाद्यावर आधारित कार्यशाळेचे"आयोजन क्षत्रिय शिक्षा संस्थान भोपाळ येथे करण्यात आली होते. महाराष्ट्रातील विदर्भ, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा विभागातील 45 कलाकारांनी या कार्यशाळेत सहभाग नोंदविला यामध्ये पोतराज ,वासुदेव,गोंधळी, शाहीर, कबीर पंथी, मसनजोगी, तसेच विविध लोक कलाकार प्राचीन जुने वाद्य घेऊन उपस्थित होते. यामध्ये ढोलक, डफडं, झांज,ताळ, एकतारी, चिपळी, सूर ,सनई,कडकणी, खंजिरी, तुतारी ,ढोल, संबळ अशा विविध लोक वाद्यांची डॉक्युमेंटेशन व्हिडिओ ग्राफी क्षत्रिय शिक्षा संस्थान च्या वतीने करण्यात आले. लोक वाद्य विषयाची इत्यंभूत माहिती लोककलाकारांच्या माध्यमातून जाणून घेतली. प्रत्येक कला प्रकाराची प्रस्तुती करून घेऊन त्याची व्हिडिओ ग्राफी आणि माहिती जाणून घेऊन त्याचे डॉक्युमेंटेशन करण्यात आले. कार्यशाळा समन्वयक प्रा. डॉ. सुरेश मकवाना यांनी सांगितले की "भविष्यात हे लोक वाद्य व त्यांचे अस्तित्व या अति आधुनिक युगात नष्ट होऊ शकतात त्याचे जतन आणि संवर्धन होणे ही काळाची गरज आहे या लोकवाद्यांमध्ये एक मधुर नाद आहे स्वर, ताल आणि लय आहे प्राचीन लोककला आणि लोकवाद्य वृंदाच्या माध्यमातून भारतीय ज्ञान परंपरा, समूह ज्ञान आणि प्राचीन त्यांची सांगड घातली जात आहे.आणि येणाऱ्या काळातही हे वाद्य नष्ट होऊ नये म्हणून त्याचे जतन आणि संवर्धन करण्यात येत आहे. असे ते म्हणाले." प्राचार्य जयदीप मंडल यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक सुरेश मकवाना यांच्या समन्वयाने ही कार्यशाळा संपन्न झाली. भारत हा विविधतेने नटलेला देश असून एक महत्त्वपूर्ण प्रयत्न या माध्यमातून होतो आहे या जुन्या लोकवाद्य लोककलांचा जतन आणि संवर्धन



या माध्यमातून भोपाळ क्षत्रिय शिक्षा संस्थानाच्या माध्यमातून होत असून अत्यंत मोलाचे हे कार्य आहे त्या माध्यमातून लोक वाद्य संरक्षण होत आहे. हा दस्तावेज भविष्यात येणाऱ्या नव्या पिढीला मार्गदर्शक असेल. शंभर वर्षानंतर या वाद्यांचे भविष्य काय असेल तर हा दस्तावेज त्यांचे मार्गदर्शन करेल असे ते म्हणाले" यावेळी डॉ. रमेश बाबू यांनी सांगितले की "भारतामध्ये श्रम संस्कृती आहे आणि लोक संस्कृती जोडलेली आहे कोणतेही कार्य करताना लोक सामूहिक समाजातील गीत गाऊन कामाची सुरुवात करतात आणि सामूहिक जीवनामध्ये या निर्माण आणि विकास होतो आहे म्हणून लोकसमूह या लोककला लोकवाद्यांच्या निर्मितीसाठी पोषक आहे. जवळपास 45 लोक कलाकारांना या ठिकाणी राष्ट्रीय मंच प्रदान करण्यात आलेला आहे. तसेच आदिवासी जनजाती संग्रहालय भोपालचे निदेशक डॉ धर्मेंद्र पारे यांनीही या कार्यशाळेला भेट देऊन लोक कलाकारांची भेट घेऊन लोकवाद्यावर आधारित या कार्य शाळेसंबंधी समाधान व्यक्त केले. डॉ कन्नूलाल विटोरे यानी सांगितले की" पाश्चात्य संगीताच्या आपल्या गोड, मधुर लोकवाद्याची धून लुप्त ना होवो.या लोकवाद्याचा सखोल अभ्यास करून नव्या पिढीसाठी संरक्षित करण्यात येत आहे ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. तसेच महाराष्ट्रातील लोक कलाकारांच्या या कलेला या निमित्ताने वाव मिळेल.यावेळी या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य जयदीप मंडल, समन्वयक डॉ सुरेश मकवाना,डॉ श्रीकृष्ण काकडे, डॉ.मोनिका सिंह,डॉ कन्नुलाल विटोरे यांची उपस्थिती होती.





गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार
किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर